ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर


स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com

www.punenagarvachan.org


पुस्तकाचे नाव : अडलेले डाव !

लेखक : कृ. भा. बाबर

प्रकाशक : समाज शिक्षण माला, पुणे

प्रकाशन वर्ष : १९७४

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे


पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

# अडलेले डाव !

कृ. भा. बाबर



863
863 / Bob
6775
D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00980

२८१ समाज शिक्षण माला

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत.

# प्रास्ताविक

रोजच्या धकाधकीच्या मामल्यात जिवाला वैताग धारण करायला लावणाऱ्या घटना हरघडी घडत गेल्या, म्हणजे माणसाला जीव नकोसा होतो. आपलं आयुष्य आरामात जावं अशी इच्छा होते. अशा वेळी कोण कुठं चुकलं याचा हिशोब केला जातो. भिजत पडलेल्या कुजून चाललेल्या गोष्टी विचारात घेतल्या जातात. या गोष्टी बाजूला सरल्या की, विस्कटलेली घडी नीट बसेल याबद्दल खात्री येते. तर अशाच काहीशा विचारामधून "**अडलेले डाव**" या पुस्तकाची रचना केली गेली आहे. माझे वडील ती. **कृ. भा. बाबर** यांनी हे पुस्तक लिहिले असून त्यासाठी त्यांनी स्वतःच्या घरातील उदाहरण सांगून आरंभ केला आहे. प्राचीन काळातील दाखले दिले आहेत. अलिकडच्या जगातील माहिती सांगितली आहे. त्यामुळे आमच्या **समाज शिक्षण मालेचे** हे **दोनशे एक्क्याऐंशावे प्रकाशन** आमच्या वाचकांना विशेष आवडेल. स्वतःविषयीही ते विचार करू लागतील व आपल्या आयुष्यात कुठे खटकते आहे, ते बाजूला सारून यशस्वी व्हायचा प्रयत्न करतील असे वाटते.

समाज शिक्षण प्रकाशन
२०९५ सदाशिव, पुणे ३०
दि. २० फेब्रुवारी १९७४

**सरोजिनी बाबर**
संपादिका
समाज शिक्षण माला

---

**मालेचे दोनशे ब्याऐंशावे प्रकाशन**

**इतिहासकालीन स्त्रियांची पत्रे**

लेखिका :-- **डॉ. सरोजिनी बाबर**

**दिनांक २० मार्च १९७४ रोजी प्रसिद्ध होईल.**

---

संपादक, मुद्रक, प्रकाशक : **डॉ. सरोजिनी बाबर**, एम्. ए., पीएच. डी.
२०९५ सदाशिव पेठ, पुणे ३०.
मुद्रण स्थळ : **आनंद मुद्रणालय**, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ३०.

अभ्यासिका
दाखल अंक 5775
वर्गांक 863 / Belba
विषय तारीख 20/4/93

# अडलेले डाव !

— १ —

रामराव माझा धाकटा भाऊ. माझ्यापेक्षा वयाने अठरा वर्षांनी लहान. माझ्या वडिलांची चार लग्ने झाली. पहिल्या बायकोचा मी व शेवटच्या बायकोचा रामराव. माझी आई मी अडीच वर्षांचा होतो तेव्हा वारली, तर रामरावाची आई तो नऊ महिन्यांचा असतानाच वारली ! वडिलांच्या मधल्या दोन बायका पोर न होताच गेल्या होत्या !

माझा सांभाळ माझी आत्या व चुलती यांनी केला. रामरावाचा सांभाळ माझ्या आत्येनेच केला. वडिलांना बायकांचे सुख मिळावे तसे मिळाले नाही. त्यामुळे साहजिकच त्यांचे लक्ष घराबाहेर लागले होते. वडील गावातील एक प्रतिष्ठित गृहस्थ होते. तरी त्यांचा संसार नीटनेटका झाला नाही. रामरावकडेही त्यांनी नीट लक्ष दिले नाही.

रामराव लहान असतानाच मी शिक्षक झालो होतो. माझ्या नोकरीच्या गावी दोन तीन ठिकाणी मी राम-

रावाला नेलेले होते. पण त्याचे लक्ष शिक्षणाकडे लागावे तसे लागत नव्हते. अखेर मराठी शाळेत सातव्या इयत्तेत असतानाच त्याने शाळा सोडली.

वडिलांची शेती बऱ्यापैकी होती. रामराव शेतकामही मनापासून करीत नव्हता. तो वयात येत चालला तसा त्यालाही बाहेरचा नाद लागत चालला, म्हणून मी वडिलांना सांगून त्याचे लग्न उरकून घेतले. शेजारच्या गावचीच एक छान मुलगी मिळालेली होती.

या बायकोपासून रामरावला सहा मुले झाली. तीन मुलगे व तीन मुली. असे असूनही रामराव घरच्या प्रपंचात रमला नाही. एका मित्राच्या संगतीने त्याने भाड्याने गाडी नेण्याचा व्यवसाय करून पाहिला. आमच्या गावाहून कोल्हापूर मार्गाने निपाणीस तो गाडीच्या खेपा करीत असे. आमची गाडी चांगली होती आणि बैलही उत्तम होते. पण भाडे करण्याची आम्हाला गरज नव्हती. घरी एक गडीही कामाला होता. परंतु बाहेर मजा मारण्यासाठी भाडे करण्याची रामरावला जरूर वाटत होती!

अखेर त्याने एक रखेली ठेवली. मला हे कळत होते. मी अनेक परीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही. माझे रामरावर चांगले प्रेम होते. त्याच्याही मनात माझ्याबद्दल आदर होता. माझ्या बायकोबद्दलही त्याच्या मनात आदर होता. ती त्याची

चांगली वास्तपुस्त करीत होती. तिनेही आपल्या परीने रामरावला सांगण्याचा प्रयत्न केला. पण एके दिवशी त्याने मला स्पष्ट सांगितले, " अण्णा, तेवढी गोष्ट सोडून मला काय वाटेल ते सांगा, मी ते करीन. " मी काय समजायचे ते समजलो व त्याला बोलायचे सोडून दिले.

वडिलांना रामरावला सांगण्याची सोय नव्हती, कारण ते जन्मभर तेच करीत आले होते !

पुढे काही दिवसांनी वडील वारले. मी बाहेर लांबच्या गावी नोकरीवर. त्यावेळी मी असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर होतो व पुण्याला राहात होतो. त्यामुळे रामरावला सारे रान मोकळे होते. वडील असतानाच आम्ही भाऊ वेगळे राहिलो होतो, तरी घर व जमीनजुमला एकत्रच होता. वडिलांच्या मरणानंतर आमच्या सरळ वाटण्या झाल्या. त्यानंतर एक वर्षात तंबाखू विकून हजार दीड हजार रुपये आले होते, रामरावने ते पैसे आपल्या बाईला घेऊन कोल्हापुरात मुक्काम ठोकून दोन तीन आठवड्यांतच उडवून टाकले !

याचा परिणाम कुटुंबावर फार वाईट झाला. पैशांची टंचाई निर्माण झाली. मुलाबाळांचे हाल व्हायला लागले. आणि त्यामुळेच हाय खाऊन त्याची बायको मरण पावली ! !

मला हे सारे दिसत होते. मी आपल्यापरीने रामरावच्या प्रपंचाला हातभार लावीत होतो, मुलांच्या शिक्षणाकडेही

लक्ष देत होतो. एका मुलीचे व दोन मुलांची लग्ने करता-नाही मी त्याला मदत केली. पण त्याचा प्रापंचिक जम बसला नाही. ज्या बाईच्यामुळे प्रपंचाचे वाटोळे झाले, तिचा नाद काही सुटला नाही.

अखेर एके दिवशी रामरावनेच इहलोकीची यात्रा संपविली. त्यावेळी तो पन्नास वर्षांचा होता. रामराव प्रकृतीने अतिशय चांगला होता. दणकट होता. दिसायलाही देखणा व रुबाबदार होता. आमच्या घराण्याला शोभेल असाच तो दिसत होता. पण एके दिवशी तो एकाएकीच गेला. त्यादिवशी सकाळी घरात न्याहरी केली आणि गाडी घेऊन शेताकडे गेला. मळीचे गवत कापून आणले आणि शेतात गडचाकडून कडब्याच्या पेंढ्या गाडीत भरत असता एकाएकी छातीत कळ येऊन तो गाडीच्या खाली उतरला, तो तेथेच संपला !

आम्हाला पुण्याला तार आली. आम्ही नवराबायको धावत पळत मोटरीने गेलो, पण त्याची गाठ पडली नाही. माझा एकुलता एक आवडता भाऊ गेला. त्याची सहा पोरे उघडी पडली आणि माझ्यावरची जबाबदारी वाढली.

त्याचे उत्तरकार्य करून व तेथील प्रपंचाची व्यवस्था लावून मी पुण्याला आलो. भाऊ गेला, पण ती आपल्या हातची गोष्ट नव्हती. मरणापुढे कोणाचे काही चालत नाही. यापूर्वी मी कितीतरी वडील माणसे मरताना

पाहिली होती व माझी स्वतःची चार पाच मुले–मुलगेही–माझ्या हातानेच दृष्टीआड केली होती.

रामराव गेल्याने मला दुःख झालेच, पण एक परीने समाधानही वाटले. मी असे म्हणणे योग्य नाही, पण ती गोष्ट खरी होती. मायेच्या पोटी दुःख होत होते, पण एक अडलेला डाव मार्गी लागेल म्हणून समाधान वाटत होते. रामरावने प्रपंच तर नीट केला नाहीच, पण तो विचारही त्याला शिवत नव्हता. रखेलीच्या प्रेमात तो इतका अड-कून पडला होता की, त्यापुढे त्याचे काही चालत नव्हते. तो हतबल झाला होता.

आणि आम्हीही सर्वजण हतबल झालो होतो. आमचेही काही चालत नव्हते. त्याची बायको मरून गेली होती. मुले लहान लहान होती. प्रपंचाचे गाडे अडून पडलेले होते.

प्रपंचाचा डाव कुजलेला होता, म्हणजेच अडलेला होता. हा डाव कसा सुरळीत करावा हे रामरावला सुचत नव्हते आणि आम्ही कोणी त्यात काही करू शकत नव्हतो.

रामरावच्या मरणाने त्याच्या प्रपंचाचे अडलेले गाडे नीटसुरळीत चालू झाले. जरा वेळ लागला, पण आता ते व्यवस्थित चाललेले आहे. शेतीभातीचे येणारे उत्पन्न जे भलतीकडे खर्च होत होते, ते थांबले; आणि ते आता घराला उपयोगी पडायला लागले.

आता रामरावच्या सगळ्या मुलांची लग्नकार्ये उरकली

आहेत. तीन मुली आपआपल्या नवऱ्यांच्या घरी नांदत आहेत; आणि तिन्ही मुलगे नोकरीवर आहेत. मोठा मुलगा गावीच शिक्षक असून, शेतीवाडीकडेही चांगले लक्ष पुरवीत आहे. त्या मुलांचे व्यवस्थित चालावे म्हणून मला जेवढे साह्य करता येईल तेवढे मी करीत आहेच.

— २ —

जगात असे अडलेले डाव अनेक ठिकाणी दिसून येतील. माणसांचे जीवन हा एक प्रकारचा खेळच आहे. खेळालाच डावही म्हणतात. माणसाचा हा खेळ नेहमीच सुरळीत चालतो असे नाही; काही ना काही अडचणी येऊन किंवा संकटे निर्माण होऊन हा खेळ–हा डाव अडतो; आणि पुष्कळ वेळा माणूस अगतिक होऊन जातो, काय करावे हे त्याला सुचत नाही. अशावेळी एकाएकी काही तरी कारण घडते आणि पुष्कळवेळा अडलेला डाव पुन्हा चालू होतो. हा डाव पुढे कसा चालतो हा प्रश्न वेगळा, पण तो थांबलेला मार्गी लागतो, यात शंका नाही.

एखाद्या माणसाच्या प्रपंचाप्रमाणे समाजाच्या आणि देशाच्या व्यवहारातही असे पेचप्रसंग निर्माण होतात आणि डाव अडतात. अशा काही अडलेल्या डावांची उदाहरणे पुढे देण्याचा माझा विचार आहे.

पुणे जिल्हयातील एक गाव. मावळातील खेडे. तिथे

एक जोडपे सुखाने नांदत होते. नवराबायकोचा प्रपंच चांगला चालला होता. उत्पन्न तसे फार मोठे नव्हते. पण पोटापुरते होते. पतीपत्नी दोघेही शेतात काम करीत, मनापासून राबत, त्यामुळे काळी आई त्यांना प्रसन्न होत होती. बरेच दिवस असे एकामागून एक आले आणि गेले. होता होता त्यांच्या सुखाला तडा जायला लागला. सुरळीत चाललेल्या गाड्याला घुणा लागायला लागला.

बरेच दिवस गेले, तरी बायको पोटूशी राहीना. तिला वाईट वाटायला लागले. फळाफुलाशिवाय वेलीला काय शोभा ? घरात बाळ रांगायला लागल्याशिवाय त्या घरात आनंद कसा नांदेल ? बाई झुरणीला लागली. देवाला आणि देवीला नवस सायास करून थकली. नवराही काळवंडून गेला. काय करावे त्यालाही कळेना.

प्रपंचाला वारस नाही, घराला धनी नाही, तर त्याला काय चाटायचें ? पोर व्हायलाच पाहिजे, तोंडात पाणी घालायला स्वतःचा मुलगा हवा, असे नवऱ्याला वाटायला लागले. बायकोलाही ते पटत होते. पण तिचा बिचारीचा इलाज चालत नव्हता. तिची कूस उजवत नव्हती. अखेर तिनेच नवऱ्याला सांगितले, ‘ तुम्ही आता दुसरे लगीन करा ! ’

दुसरे लगीन केल्याशिवाय भागायचे नाही हे नवऱ्यालाही समजत होते, पण त्याचा जीव कासावीस होत होता.

बायकोवर त्याचे जिवापलीकडे प्रेम होते. दुसऱ्या लग्नानंतर हे प्रेम असेच टिकणे शक्य नाही, हे त्याला कळत होते. म्हणून त्याची त्या दुसऱ्या लग्नाला तयारी होत नव्हती. मन धजत नव्हते.

पण प्रश्न एवढ्याने सुटण्यासारखा नव्हता. एक बायको असताना दुसरी बायको करायला कायद्याची अडचण येत होती, हा दुसरा प्रश्न पहिल्या प्रश्नापेक्षाही महत्त्वाचा होता.

पेचप्रसंग उत्पन्न झाला होता. ह्यातून सुटका कशी करून घ्यावी ह्याचा विचार ती दोघे नवराबायको करीत होती. अखेर एके दिवशी बायकोनेच मनाचा धडा केला आणि ती म्हणाली, " असे केले तर ? "

" कसे ? " नवऱ्याने विचारले.

" आपण दोघे काडी मोड करून घेऊया, म्हणजे तुम्हाला दुसरे लग्न करता येईल; आणि काडीमोड घेतली तरी मी पहिल्यासारखीच तुमच्या घरी राहीन, तुम्ही मला जलमभर संभाळा मजी झालं. "

नवऱ्याला हा विचार पसंत पडला.

नंतर त्या दोघांनी एखाद्या वकिलाचा सल्ला घेऊन पुढे पाऊल टाकायचे ठरविले व त्याप्रमाणे एके दिवशी ती दोघे पुण्याला वकिलाकडे म्हणून आली. पुण्याला श्री. सर्जेराव जाधव सरकारी वकील यांना येऊन भेटली.

जाधव वकील आपल्या माडीवरच्या ऑफिसात कागद

चाळीत बसले होते, वेळ सकाळची होती. तोवर जिन्या-वर पावले वाजली. वकिलांनी जिन्याकडे पाहिले. दोन खेडूत स्त्री–पुरुष दरवाजात येताना त्यांना दिसली. वकिलानी त्यांना 'या बसा' म्हटले. खुर्च्यांकडे बोट दाखविले. ती नवराबायको संकोचली, खुर्च्यांवर कसे बसायचे असे त्यांना वाटले. पण वकिलांनी विचारले,

"काय काम आहे ?"

"आपणाकडेच आलोय" नवरा म्हणाला.

"ठीक आहे. पण काम काय आहे ?"—वकील.

"काम थोडं नाजूक आहे."—खेडूत पुरुष.

"असू द्या. पण मला सांगण्यासारखं आहे ना ?"

"तर तर. मग कशाला आलूया."

"बोला तर."

"आम्ही दोघं नवराबायको हाओ."

"समजले."

"आमी काडीमोड करून घ्यावी म्हनतो."

"का हो ? तुमचे पटत नाही काय ?"

इतका वेळ गप्प बसलेली बायको बोलू लागली,

"तसं न्हाई वो. आमचा संसार चांगला चाललाय. आमचं भांडण बिडण होत नाही ?"

"मग का काडीमोड करून घेता ?"

"मला मूलबाळ होत न्हाई. तवा त्यासनी दुसरं लगीन

करा असं मीच म्हनते."

"अस्सं अस्सं. पहिली बायको असताना दुसरे लग्न करता येत नाही, म्हणून तुम्ही हा मार्ग काढलाय."

"हं ग तसंच बगा."

त्यावर वकील थोडा वेळ थांबले. त्यानी काहीसा विचार केला आणि मग ते म्हणाले,

"मूलबाळ व्हावे म्हणून नवस-सायास केल की नाही?"

"तर वो." नवरा म्हणाला, "मस्त यत्न केलेत. सगळे देव पालथे घातले, पण उपयोग झाला नाही."

"डॉक्टरी इलाज काही केला का?" वकिलांनी विचारले.

"ह्यात डागदार वो काय करनार?" नवरा म्हणाला.

"बरे तर. आपण आता तो प्रयत्न एकदा करून पाहू; आणि मग काडीमोड कशी करायची ते मी सांगेन." असे म्हणून वकील थांबले.

त्यांनी आपल्या ओळखीच्या डॉक्टरांना फोन केला. त्यांना सर्व सांगितले. आणि आपल्या मोटरीतून त्या जोडप्याला डॉक्टरांच्याकडेही नेले.

डॉक्टरांनी त्या दोघांची तपासणी केली आणि औषधे लिहून दिली.

मग वकिलांनी त्यांना सांगितले, "ह्या औषधांचा काय उपयोग होतो, ते पाहूया आणि मग आपण पुढचा विचार करू. काही दिवसांनी पुन्हा वाटल्यास येऊन जा."

ती खेडूत नवराबायको वकिलाच्या पाया पडून आपल्या घरला गेली. जाताना डॉक्टरानी सांगितलेली औषधेही त्यांनी नेली.

काही दिवस गेल्यावर चमत्कार घडला. ती बायको गरोदर राहिली. मधे एकदा येऊन नवऱ्याने वकिलांना ही आनंदाची बातमी सांगितली.

अखेर पुरे दिवस भरल्यावर ती बाई बाळंत झाली. मुलगा झाला. वंशाला दिवा लागला.

तीही बातमी पेढे घेऊन नवऱ्याने वकिलांना सांगितली;



आणि अखेरीस दोनतीन महिने गेल्यावर त्या मुलाला घेऊन ती नवराबायको पुण्यास आली व त्यांनी त्या मुलाला

वकिलांच्या पायावर घातले !

अडलेला डाव आता मार्गी लागला होता. वकिलांनाही समाधान वाटत होते. वकिली कायद्याने नव्हे तर व्यवहारी मार्गाने आपण हे कोडे सोडविल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर विलसत होता.

काडीमोड किंवा घटस्फोट म्हणजे नवराबायकोनी एकमेकापासून वेगळे राहाणे, हा उपाय अडलेला प्रापंचिक डाव सोडविण्यासाठी पुष्कळजण उपयोगात आणतात. प्रेमाने वागून, जमवून घेऊन, पडते खाऊनही जर जमत नसेल, स्वभावातील अंतर वाढतच असेल, तर मानसिक तणाव वाढविण्यात आणि शारीरिकही हाल–अपेष्टा भोगण्यापेक्षा एकमेकांनी फारकत करून घेणे काही वाईट नाही. जमतच नसेल तेव्हा करायचा हा उपाय.

मूल होत नसेल तेव्हा एखादा मुलगा किंवा मुलगीही दत्तक घेऊन अडलेला डाव सुरळीत करण्याचा प्रयत्न काहीजण करीत असतात. हा प्रयत्न नेहमी यशस्वी होतोच असे नाही, पण तो एक प्रयत्न आहे खरा. केव्हा केव्हा अडलेले गाडे सुरळीत चालतेही.

— ३ —

स्वामी सत्यदेव यांनी सांगितलेली एक गोष्ट.

स्वामी सत्यदेव हे पंजाबातील एक थोर पुरुष होते.

ते एकदा डोळ्याच्या ऑपरेशनसाठी युरोपात ऑस्ट्रिया देशात गेले होते. तेथे ते एका कुटुंबात राहात होते. ह्या कुटुंबात एक बाई कामाला होती. ही बाई विधवा होती. तरी ती समाधानी वृत्तीची व हसतमुख होती. आपले काम ती आनंदाने करीत असे.

स्वामीजींना ह्या बाईच्या वागणुकीचे नवल वाटत असे. भारतामधील विधवा स्त्रिया दुखर्मुलेल्या आणि हताश अशा पाहिलेल्या असल्याने त्यांना त्या बाईसंबंधी विशेष वाटले तर आश्चर्य नाही.

अखेर एके दिवशी स्वामीजींनी त्या बाईला विचारलेच, " बाई, तुम्ही विधवा आहात, मोलकरणीचे काम करीत आहात, तरी नेहमी आनंदी दिसता, हे कसे ? आमच्या देशातील विधवा स्त्रिया अशा दिसत नाहीत. "

त्यावर त्या बाईनें आपली हकीकत सांगितली ती अशीः—

स्वामीजी, आपण विचारलेच म्हणून सांगते. मी आज ह्या घरात मोलकरणीचे काम करीत आहे. पण माझ्यावर अडचणीचा प्रसंग आलाने सध्या मी हे काम करीत आहे. आज माझी परिस्थिती खालावलेली आहे. पण पूर्वी असे नव्हते. पूर्वी मीही श्रीमंत होते. माझे पती व मी सुखा-समाधानाने जगत होतो. असे बरेच दिवस गेले. पण पुढे पारडे फिरले. माझे पती एकाएकी आजारी पडले. त्यांचा आजार फार काळ टिकला. आमचा धंदा बसला

आणि घरात होते नव्हते ते सारे त्यांच्या आजारात खर्च झाले. शेवटी एके दिवशी ते मला सोडून गेलेच !

पतीच्या निधनानंतर माझ्यावर डोंगरच कोसळला. माझ्या संसाराचा डाव फिसकटला. तो अडलाच. मी अगदी बेचैन होऊन गेले. पतीवर माझे अतिशय प्रेम होते. त्यामुळे ते गेल्यानंतर आता आपण जगण्यात अर्थ नाही, असे मला वाटू लागले. माझ्या मनात आत्महत्येचे विचार जोर धरू लागले. एके दिवशी तर त्या विचारांनी चांगलेच थैमान मांडले. त्या दिवशी आत्महत्या करण्याचे मी नक्की ठरविले. मग थोडा वेळ शांत पडले. तेवढ्यात माझा डोळा लागला. जागी झाले, तर माझ्या विचारात एकदम पालट झाला. नवीन विचार डोक्यात शिरला. मी आत्महत्या कशासाठी करावयाची हे मला कळेनासे झाले. मी मरून गेले तर माझ्या पतीची गाठ पडेल काय ? हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला आणि ते शक्य नाही, हे उत्तरही माझ्या मनानेच दिले. मी मरून जर त्यांची गाठभेट होणार नसेल, तर मी काय म्हणून मरून जायचे ? असे मला वाटायला लागले. आणि त्यानंतर मी आत्महत्येचे विचार डोक्यातून काढून टाकले.

मी जगायचे ठरविले. आणि त्याच वेळी हेही ठरविले की, एवीतेवी जगायचेच तर मग रडत का? समाधानाने आनंदाने उरलेले आयुष्य घालवावे असे मी ठरविले आणि

त्याप्रमाणे मी वागत आहे.

स्वामी सत्यदेव यांनी ही हकीकत फार दिवसांपूर्वी अलाहाबादच्या ‘सरस्वती’ मासिकात लिहिलेली मी वाचली होती. मला ती फार आवडली. महत्त्वाची वाटली. आणि मी अनेक वेळा शिक्षकांच्या सभासंमेलनातून ती सांगितली आहे, काही लेखांतूनही लिहिली आहे.

ऑस्ट्रियातील त्या बाईने अडलेला डाव कसा सुरळीत केला, ते मला फार महत्त्वाचे वाटते. शिक्षकाची नोकरी करणारे पुष्कळ लोक नेहमी कुरकुरत असतात, “आपणाला पगार फार कमी मिळतो, समाजात आपणाला कोणी विचारीत नाही, कामात लक्ष लागत नाही” इत्यादि प्रकारच्या तक्रारी ह्या लोकांच्या असतात. उदासीन वृत्तीनेच त्यांपैकी बरेच जण वागत असतात. वेगळे काही करता येत नाही, ती अक्कलही नसते, आणि निराशेने पछाडलेल्या अवस्थेत एकप्रकारे त्यांचा प्रपंच चाललेला असतो; एक प्रकारे त्यांचा प्रपंचाचा डाव कुजलेलाच असतो. अशा लोकांना मी या आस्ट्रियन बाईची गोष्ट सांगतो आणि मग म्हणतो की, “शिक्षकाची नोकरी करण्यासाठी कोणी तुमच्या मागे लागलेले नव्हते. तुम्ही आपण होऊन ही नोकरी पत्करलेली आहे. तुम्हांला ती आवडो अथवा न आवडो तुम्ही ती स्वीकारली आहे ना ? मग कुरकुर का करता ? नको असली तर सोडून द्या

बघू, आणि करायचीच असली, तर मग कुरकुर करू नका. करायचीच तर आनंदाने, उत्साहाने करा. तसे केल्याने तुमचे कल्याणच होईल."

शिक्षकांनाच ही गोष्ट लागू आहे असे नाही. इतर व्यवसाय करणारांनाही ती लागू आहे. साधारणपणे असे दिसून येते की, पुष्कळ लोकांना आपल्यापेक्षा इतरांचा उद्योग अधिक चांगला वाटतो, फायद्याचा वाटतो. आपणाला येणाऱ्या अडचणी किंवा आपणाला भोगावी लागणारी दुःखे इतरांच्या वाट्याला येत नसावीत असे त्यांना वाटते. पण ते खरे नसते. ज्याचे सुख त्यालाच माहीत!

म्हणून आपण पतकरलेला उद्योग समाधानाने करणे हाच उत्तम मार्ग. तसे केल्यानेच आपली उन्नती होते. गीतेत भगवान श्रीकृष्णाने सांगितलेला कर्मयोग अशानेच साधतो.

व्यक्तीच्या जीवनप्रवाहाला अडथळा झाल्याची उदाहरणे एथवर दिलेली आहेत. अडलेले हे डाव कायमचे अडून राहात नाहीत, काही काळ अडून राहातात आणि मग त्याला वाट मिळते. पाण्याचा प्रवाह नाही का काही काळ अडून राहात? मग तो कोठून तरी कशीतरी वाट काढतो आणि पुन्हा वाहू लागतो. मानवी जीवनही असेच सतत वाहात राहाते. ते काही काळ अडते, त्या वेळी काय घडते आणि त्यानंतर ते कशाप्रकारे चालू होते, हे सांगण्यासाठी मी हा प्रपंच करीत आहे.

— — ४ — —

व्यक्तीच्या जीवनाप्रमाणेच व्यक्तींच्या समुहाच्या म्हणजे समाजाच्या जीवनातही काही घटना घडत असतात; आणि समाजाचे जीवनही काही काळ अडून राहाते, कुजून जाते; व मग केव्हातरी अशा काही वेगळच्या घटना घडतात की ते मग पुन्हा सुरळीत वाहू लागते. मात्र व्यक्तीच्या जीवनाच्या मानाने सामाजिक जीवनातील अडवणूक व तीतून सुटका यांना अधिक काळ लागतो. स्त्री आणि पुरुष ही मानवी समाजाची दोन प्रमुख अंगे. समाज हा या दोहींचा बनलेला असतो. आजच नव्हे तर अगदी आरंभीच्या काळापासून, म्हणजे माणूस ह्या पृथ्वी-वर जन्माला आल्यापासून ही स्थिती आहे. स्त्री आणि पुरुष हे समाजाचे प्रमुख घटक आहेत. हे दोन्ही घटक सारखेच महत्त्वाचे आहेत. त्यांपैकी एकच कोणी असून चालणार नाही. म्हणून समाजामध्ये या दोघांनाही समान-तेची वागणूक मिळणे जरूर आहे. समाज सुरळीत चालण्या-साठी ह्या गोष्टींची आवश्यकता आहे.

पण जेव्हा असे घडत नाही, तेव्हा समाज जीवनात अडथळा निर्माण होतो, जीवनप्रवाह अडतो; आणि काही काळ अस्वस्थता निर्माण होते.

पृथ्वीवर जेव्हा केव्हा स्त्रीपुरुषांचे पहिले जोडपे निर्माण झाले असेल, तेव्हाच मानवी जीवनप्रवाह सुरू झाला.

त्या जोडप्याला मूल झाले आणि त्या जीवनप्रवाहाला आरंभ झाला. स्त्री आणि पुरुष ही दोन्ही अंगे महत्त्वाची असली, तरी मानवी जीवनप्रवाह सुरू ठेवण्यात स्त्रीचा वाटा मोठा आहे. नवीन प्रजा जन्माला घालण्याचे आणि त्याची वाढ व सांभाळ करण्याचे काम मुख्यत: तिलाच करावे लागते. त्यासाठी निसर्गाने तिच्या ठायी माया, प्रेम, वात्सल्य ह्या गुणांचीही उपज केलेली आहे. वत्स म्हणजे वासरू. वात्सल्य म्हणजे गाय वासरावर जसे प्रेम करते, तसे प्रेम करणे. आपल्या पोटात मुलाला नऊ महिने सांभाळणाऱ्या आईला ते मूल तिच्या पोटातून बाहेर आल्या-वर लगेच पान्हा फुटतो. त्या मुलासाठी तिला दूध येते आणि त्या मुलाला आपल्या मांडीचे सिंहासन देऊन बाळ-राजा म्हणून ती त्याचे संगोपन करते.

अगदी प्राचीन काळी कुटुंबव्यवस्था नव्हती. माण-सांची संख्याही फार नव्हती. त्याकाळी आईचे महत्त्वच अधिक होते. आईच स्वत:चे व आपल्या बाळाचे भरण-पोषण करीत असे. तिच्याशी संबंध ठेवणारा पुरुष त्या संबंधानंतर तिची फारशी चौकशी करीत नसे.

पुढे माणसांची संख्या वाढायला लागली, तेव्हा स्त्रीशी संबंध ठेवणारे पुरुषही एकत्र राहू लागले व कुटुंबव्यवस्था निर्माण होऊ लागली. ह्या काळात साहजिकच स्त्रीला त्या-कुटुंबात महत्त्वाचे स्थान होते. तिच्या धोरणानेच पुरुष व

मुले वागत. ह्या प्रकारच्या कुटुंबव्यवस्थेला मातृसत्ताक पद्धतीची कुटुंबव्यवस्था म्हणतात. म्हणजे मातेचीच सत्ता तेथे मुख्यतः चालत होती.

यानंतर बऱ्याच वर्षांनी असा प्रसंग उत्पन्न झाला की कुटुंबाचे गाडे अडू लागले. स्त्रीला मुले जास्त होऊ लागली आणि तिच्याशी संबंध ठेवणारा पुरुष घरात कायमचा राहू लागला, तेव्हा कुटुंबाच्या भरणपोषणाची जबाबदारी स्त्रीने हळू हळू सोडून दिली; आणि मग ती पुरुषाने उचलली. पूर्वी मुलांच्या व स्वतःच्या पोषणाची काळजी स्त्रीच वाहात होती. रानात जाऊन कंदमुळे, फळे वगैरे ती स्वतःच आणीत होती आणि ती स्वतः शिकारही करीत होती. पण आता तिने हे काम सोडून दिले व ते पुरुषावर सोपविले.

त्यावेळी मानवी जीवनात मोठी क्रांती झाली; आणि त्या क्रांतीने मानवी जीवनाचा प्रवाह पुन्हा व्यवस्थित चालू झाला, अडलेला डाव पुन्हा सुरू झाला.

क्रांती कोणती झाली ?

मातृसत्ताक पद्धती मागे पडली आणि पितृसत्ताक पद्धती सुरू झाली. म्हणजे कुटुंबात मातेची म्हणजेच आईची सत्ता कमी झाली आणि पित्याची म्हणजे बापाची सत्ता सुरू झाली. मुले सांभाळीत आई घरी राहू लागली आणि बाप त्यांच्या खाण्यापिण्याची तजवीज करू लागला,

तेव्हा साहजिकच त्याच्या धोरणाने कुटुंबातील इतर माणसांना वागावे लागले.

कुटुंबातील लहान मुले परस्वाधीनपणामुळे आपोआपच वडील माणसांच्या आज्ञेत राहात आली आहेत, पण कुटुंबातील प्रमुख स्त्री जी पूर्वी स्वतः कुटुंबाची कर्ती होती, तिला आता दुय्यम स्थान प्राप्त झाले. समान असलेल्या स्त्रीपुरुषांमध्ये आता स्त्रीला बरोबरीचा हक्क राहिला नाही, कमीपणा प्राप्त झाला.

किती कमीपणा ?

न स्त्रीस्वातंत्र्यमर्हति

म्हणजे स्त्री ही स्वातंत्र्य मिळवू शकत नाही किंवा तिला स्वातंत्र्य देण्याच्या लायकीची ती नाही, असे म्हणण्याची पाळी आली.

एव्हापासून स्त्री जीवनाचा कोंडमारा सुरू झाला. एके काळी विद्वान पुरुष ऋषीच्या बरोबरीने वेदांतील ऋचा म्हणजे कवने रचणाऱ्या स्त्रीला पुढे वेदाचा अभ्यास करण्यालाही मनाई करण्यात आली. इतरांच्या जाऊद्या पण ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या स्त्रियांनाही वैश्य व शूद्र यांच्या प्रमाणे कमी मानण्यात येऊ लागले. भगवद्गीतेसारख्या पवित्र मानल्या गेलेल्या ग्रंथात आणि भगवान श्रीकृष्णासारख्या पूर्ण अवतार मानलेल्या थोर पुरुषाच्या तोंडी

स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः तेऽपि यान्ति परां गतिम् ।
म्हणजे स्त्रिया, वैश्य आणि शूद्र हेही परम म्हणजे श्रेष्ठ पदाला पोचतात, असे वाक्य घातलेले आहे. याचा अर्थ भगवद्गीता रचली, त्याकाळी स्त्रियांचा दर्जा ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यापेक्षा खालावलेला होता.

भगवद्गीतेतील नवव्या अध्यायातील ३२ व्या आणि ३३ व्या श्लोकांमध्ये म्हटले आहे की, " अर्जुना, तू माझा आश्रय कर, म्हणजे माझी भक्ती कर, माझ्यावर विश्वास ठेवून वाग. कारण माझी भक्ती करणारे पापी लोकही चांगल्या गतीला पोचतात. स्त्रिया, वैश्य आणि शूद्र यांनाही चांगली गती प्राप्त होते. मग ब्राह्मण, क्षत्रिय व पुण्यवान लोक यांची गोष्ट बोलायलाच नको." पूर्वीच्या काळी मागच्या जन्मात काही पाप केल्याखेरीज स्त्रियांचा, वैश्याचा किंवा शूद्राचा जन्म प्राप्त होत नाही, असे समजून वरील विवेचन केलेले आहे.

गीतेतील ह्या श्लोकांवर संतापून दलितवर्गातील लोक गीता जाळून टाकण्यास तयार झालेले आहेत. कारण ह्या श्लोकांवरून त्यांना पापी समजण्यात आलेले आहे. स्त्रियांचीही स्थिती तीच आहे !

स्त्रीला असा कमी दर्जा प्राप्त झाला, तेव्हा कुटुंबातील तिचे स्थान आणखीनच कमी झाले. तिला गुलामीचे किंवा दासीचे स्थान ह्या काळात प्राप्त झाले होते, म्हटले

तरी चालेल. ती पुरुषाच्या उपभोगाची एक वस्तू होऊन बसली होती. घरातील पुरुषाच्या मालकीच्या इतर वस्तूंप्रमाणेच स्त्रीवरही त्याचा अधिकार स्थापन झाला होता व त्यामुळे आपल्या स्त्रीकडे इतर कोणी पाहू नये, किंवा तिने इतर कोणाशी कसलाही संबंध ठेवू नये, असे त्याला वाटू लागले होते. याचाच परिणाम म्हणून आपल्या इच्छेच्या विरुद्ध वागणाऱ्या स्त्रीला पुरुष वाटेल तसल्या शिव्या देत असे, मारहाण करीत असे आणि प्रसंगी ठारही करून टाकीत असे !

स्त्रियांच्या वरचा आपला मालकी हक्क कायम राहावा ह्यासाठी पुरुषांनी अनेक युक्त्या योजलेल्या आहेत.

पती देवचि असे ललनांना

ही त्यातीलच एक युक्ती. नवरा कसाही वागला तरी त्याला देव समजून स्त्रीने वागले पाहिजे, अशा प्रकारची समजूत स्त्रियांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न झाला. पतिव्रता स्त्रियांनाच स्वर्ग मिळतो, असेही त्यांना सांगून टाकले. आणि म्हणूनच नवरा मरण पावला असता त्याच्या बायकांनी सती गेले पाहिजे, अशी प्रथा घालून दिली ! एखादी स्त्री अशी सती गेली नाही, तर तिने उरलेले वैधव्याचे आयुष्य उदासीनपणे घालवावे, पांढरे वस्त्र नेसावे, शृंगार करू नये इत्यादि नियम तिच्या मागे लावले. ब्राह्मण लोकांनी तर विधवा स्त्रियांचे डोक्याचे केसही काढून

टाकण्याची पद्धत सुरू केली. अशा स्त्रियांच्या मनात आले तरी त्यांनी पुन्हा विवाह करता कामा नये, असाही नियम करून टाकला. अशा प्रकारे वागणे हे घरंदाजपणाचे आहे, असेही ठरवून टाकले. स्त्रियांनी पडदानशीन राहावे, तोंडावर बुरखा घ्यावा इत्यादि नियम मोठ्या कुळातील मानणाऱ्या पुरुषांनी एवढ्याचसाठी घालून दिले की, त्या स्त्रियांच्याकडे कोणाची नजर जाऊ नये व आपल्या मालकी हक्कावर गदा येऊ नये !

स्त्रीवर पुरुषाचा मालकी हक्क कसा चालत होता, याची उदाहरणे इतिहासात पूर्वीच्या काळापासून दिसून येतात. प्राचीन काळी घडलेले 'रामायण' हे याचे ठळक उदाहरण आहे. रावणाने सीतेला पळवून नेली आणि रामाच्या मालकीपणाला बाध आला म्हणूनच रामायण घडले. राम-रावण युद्ध मोठ्या प्रमाणात झाले आणि रामाने रावणाला ठार मारून टाकले, त्याचे कारण तरी दुसरे काय ? स्त्रियांच्या मालकी हक्कावरून जगात इतर देशांतही आजवर अशी अनेक युद्धे झाली आहेत.

कौरव-पांडवांच्या मधील भारतीय युद्ध जमिनीच्या मालकी हक्कावरून मुख्यतः झाले असले, तरी पांडवांची स्त्री द्रौपदी हिचा, भरसभेत नेसते वस्त्र फेडण्याचा प्रयत्न करून जो अपमान कौरवांनी केला, तेही ह्या युद्धाचे एक कारण आहेच.

माणूस घरदार जमीन-जुमला ह्यांना ज्याप्रमाणे आपल्या मालकीच्या वस्तू मानतो, त्याचप्रमाणे तो आपल्या स्त्रीलाही समजतो. म्हणून घरदार शेतीवाडी यांच्या मालकी हक्कावरून जशी भांडणे होतात, तशीच



ती परस्त्रियांना हात लावण्यावरूनही घडून येतात! याचा अर्थ स्त्री ही पुरुषाच्या मालकी हक्काची एक वस्तू झालेली आहे.

माणुसकीच्या दृष्टीने ही गोष्ट योग्य झालेली नाही. अन्यायाची झालेली आहे. स्त्रियांच्या हक्कावर गदा आलेली आहे. त्यांना समानतेची वागणूक राहिलेली नाही. आणि शेकडो वर्षे हे असे चाललेले आहे. गुलाम बनून गेलेली स्त्री-जात अगतिक झाली. काय करावे हे तिला कळेनासे

झाले. एकपरीने त्यांचा हा डाव कुजला, अडला.

पण अलिकडे काही वर्षांत स्त्रियांमध्ये जागृती झाली आहे; आणि त्यांनी प्रयत्न करून आपला अडलेला डाव उलटविण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. अजून त्याला पूर्ण यश आलेले नाही, पण त्यांचे गाडे सुरळीत चालायला सुरवात झालेली आहे.

आपल्या भारतामध्ये आणि विशेषतः हिंदूंमध्ये या दृष्टीने पुष्कळ कार्य झालेले आहे. आपल्या घटनेने स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे स्थान दिलेले आहे. आर्थिक दृष्टीने-ही सुधारणा झालेली आहे. नवऱ्याच्या मिळकतीत मुला-बरोबरच बायकोलाही हिस्सा कायद्याने दिलेला आहे; आणि बापाच्या मिळकतीत भावाबरोबर बहिणीलाही हिस्सा मिळालेला आहे. विवाहाच्या बाबतीत वयात आलेल्या स्त्रीला पूर्ण मोकळीक आहे. धर्माचे अथवा जातीचे बंधन कायद्याने ठेवलेले नाही. घटस्फोटाचाही कायदा बराच सैल केलेला आहे; आणि आता गर्भ-पाताच्या कायद्यातही बरेच उदार धोरण ठेवलेले आहे. सतीची चाल तर सव्वाशे वर्षांपूर्वीच कायद्याने बंद झालेली आहे.

तथापि अजूनही पुष्कळ ठिकाणच्या स्त्रिया स्वावलंबी होऊन स्वतः मिळवीत नसल्याने एक परीने परावलंबी व गुलामीचे जिणे जगत आहेत. तरी पण आता पूर्वीची

स्थिती राहिलेली नाही. पुष्कळ सुधारणा झालेली आहे आणि कुजलेला डाव तसाच राहिलेला नाही.

— ५ —

सामाजिक दृष्टचा स्त्रियांच्या जीवनप्रवाहात अडथळे निर्माण झाल्याचे जसे आजवर घडलेले आहे, तसे काही पुरुषांच्या बाबतीत सुद्धा घडून आल्याचे इतिहासात आढळून येते. आजही काही प्रमाणात ते चालू आहे.

जगात आजवर असे घडत आलेले दिसत आहे की, जो जबरदस्त असतो, तो इतरांवर कुरघोडी करतो. बलवान हा वेळप्रसंगी दुबळ्यांना ठार मारून टाकतो. मोठा मासा लहान माशाला खाऊन टाकतो, त्याप्रमाणे इतर बलवान प्राणी दुबळचा प्राण्यांना मारून खात आले आहेत. माणसेही त्याला अपवाद नाहीत. जगात मांसाहारी लोकांची संख्या फार मोठी आहे. हे मांसाहारी लोक मोठ्या प्रामाणात पशुपक्ष्यांना मारून खात असतात. समुद्रातील व नद्या तळ्यांतील मासे तर त्यांच्या आवडीचे खाणे आहे. गरीब बिचाऱ्या शेळ्यामेंढ्या त्यांच्या खाण्यात पुष्कळ येतात.

अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैवच नैवच
अजापुत्रं बलिं दद्यात् देवो दुर्बलघातकः

असे जुन्या काळच्या शहाण्या लोकांनी म्हणून ठेवलेले आहे.

"घोड्याला नाही, हत्तीला नाही, वाघाला तर नाहीच नाही, शेळीच्या मुलाला म्हणजे बोकडाला बळी देण्यात येते, देवसुद्धा दुबळ्याचाच घात करतो." असा याचा अर्थ आहे. पूर्वी यज्ञयागात बोकडाला बळी देत असत, त्याला उद्देशून हे म्हटले आहे. आजही देवाच्या किंवा देवीच्या पुढे शेकडो बकरी मारली जातात किंवा कोंबड्या उतरून टाकल्या जातातच की !

असे म्हणतात की, पूर्वीच्या काळी माणसांनाही मारून खाण्यात येत असे. श्रियाळ राजाची कथा प्रसिद्ध आहे. राजा श्रियाळ आणि त्याची बायको चांगुणा यांचे सत्त्व पाहण्यासाठी अतिथीच्या रूपाने ब्राह्मण होऊन आलेल्या देवाने त्यांचा मुलगा बाळ चिलिया याला मारून आणि रांधून खायला घालायला लावल्याची व पुन्हा त्या बाळाला जिवंत केल्याची कथा काय सांगते ?

माणसाला माणसांनी मारून खाल्ल्याची उदाहरणे फारशी नसली, तरी माणसांनी माणसाला गुलाम बनविल्याची व जनावराप्रमाणे त्यांची विक्री केल्याची उदाहरणे मात्र भरपूर घडलेली आहेत. राजा हरिश्चंद्राची कथा ह्या दृष्टीने चांगली बोलकी आहे. हरिश्चंद्र राजाने स्वप्नात एका ब्राह्मणाला आपले राज्य दान केले आणि प्रत्यक्षात तो ब्राह्मण ते राज्य मागायला आला असता त्याला ते देऊनही टाकले. पण त्या दानावर त्या ब्राह्मणाने दक्षिणा

मागितली ती देताना पंचाईत पडली. आधीच सारे देऊन टाकल्यावर दक्षिणा देण्यास काही उरले नाही, तेव्हा राजा हरिश्चंद्राने आपणाला, आपल्या बायकोला व मुलाला विकून ती दक्षिणा भागविली ! ! राजा हरिश्चंद्र केव्हा होऊन गेला कुणाला ठाऊक. पण त्याची कथा ही एक परंपरागत चालत आलेली लोककथा आहे. ह्या कथेवरून फार पूर्वीच्या काळी आपल्या देशात गुलामाची चाल होती व माणसाला माणसे विकत घेत होती, हे उघड दिसते.

जबरदस्त माणसे जनावरांना पकडून ज्याप्रमाणे आपल्या कामाला लावीत, त्याचप्रमाणे जुन्या काळी ती दीनदुबळ्या माणसांनाही पकडून कामाला लावीत ! विशेषतः लढाईत पकडलेल्या माणसांना गुलाम म्हणून राबवून घेत. जुन्या काळी राज्ये लहान लहान होती आणि त्यांची आपसात वरचेवर युद्धे होत. ह्या युद्धांत पकडलेल्या किंवा जिंकलेल्या माणसांना गुलाम बनवीत. ज्यांना नोकरचाकर हवे असतील असे लोक गुलामांना विकत घेत आणि जनावरे विकत घेऊन पाळीत, तसेच त्यांना सांभाळीत.

पूर्वी युरोप खंडातील ग्रीस देश फार सुधारलेला होता. दोन हजार वर्षांपूर्वीच ह्या देशात सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल व प्लेटो म्हणून तीन मोठे पुरुष होऊन गेले. ते तत्त्वज्ञानी

होते. सॉक्रेटिस तर साधू पुरुष म्हणून प्रसिद्ध होता. पण त्या थोर लोकांच्या काळात ग्रीस देशात गुलामीची पद्धत होती; आणि ह्या थोर पुरुषांनी तिला नावे ठेवलेली नाहीत, उलट तिचे समर्थनच केलेले आहे ! म्हणजे आज जनावरे पाळताना आपणाला त्यांच्याबद्दल काही वाटत नाही, त्यांची कणव वाटत नाही, आपण त्यांच्यावर जुलूम करीत आहो असे वाटत नाही, तसेच त्या काळी गुलाम माणसांची खरेदी-विक्री करताना किंवा त्यांना पाळताना मालकाला काही वाटत नव्हते.

इजिप्त देशातील पिरामीडांसारखी अजस्र कामे किंवा चीनच्या उत्तरेकडील १५ शे मैल लांब आणि ३० फूट उंच व १५ फूट रुंद अशा भिंतींचे काम ही त्याकाळच्या गुलामांकडूनच करून घेतलेली कामे आहेत.

सुमारे चारशे वर्षांपूर्वी युरोपातील गोरे लोक अमेरिकेत राहायला गेले, तेव्हा त्यांनी जमीन साफसूफ करायला, रस्ते तयार करायला, शेती करायला व इतर कामांसाठी आफ्रिकेतील काळे निग्रो लोक गुलाम म्हणूनच जबरदस्तीने पकडून नेलेले आहेत. मेंढरासारखी ही माणसे बोटीत भरून तिकडे नेली. गोरे लोक सुधारलेले होते. त्यांच्याजवळ चांगली हत्यारे होती. दारुगोळा होता. बिचारे निग्रो लोक रानटी आणि अडाणी होते. त्यांचे ह्या गोऱ्या लोकांपुढे काही चालले नाही. आज अमेरिकेत असलेले काळे

लोक हे सारे ह्या निग्रो गुलामांचेच वंशज आहेत.

गुलामांची पद्धत ही माणुसकीला काळिमा लावणारी गोष्ट आहे. गुलामांचे जीवन हे मानवी जीवनच नव्हे, ते पशूंचेच जीवन होते. त्यांच्या मानवी जीवनाचे गाडे अगदीच अडलेले होते. जगातील काही थोर व उदार मनाच्या लोकांना हे आवडत नव्हते. त्यांनी ह्या गुलामगिरीविरुद्ध जोराची चळवळ केली. तिचा परिणाम म्हणून इ. स. १८६५ साली अमेरिकेत ही पद्धत बंद झाली. ह्या चळवळीचे मोल म्हणून अमेरिकेतील लोकप्रिय व दयाळू



प्रेसिडेंट महात्मा आब्राहाम लिंकन यांचा बळी पडला! जुन्या सनातनी लोकांनी नाटकाच्या थिएटरमध्ये त्यांचा खून केला.

मी १९२३ साली ‘एक नमुनेदार विद्यार्थी’ म्हणून बुकर टी. वॉशिंग्टन यांचे चरित्र लिहिलेले आहे. हा बुकर जन्माला आला त्यावेळी अमेरिकेत गुलामगिरी चालू होती. तो थोडा मोठा झाल्यावर ती बंद झाली. लहानपणी त्याने आपल्या आईला विचारले होते, ‘आई, माझे वडील कोण?’ तेव्हा त्या माउलीने उत्तर केले, ‘बाळ, ते मी कसे सांगू? गुलाम म्हणून माझा अनेक धन्यांशी संबंध आला. तेव्हा तुझे वडील नेमके कोणते हे मला कसे सांगता येईल?’

ह्या बुकरने लिहिले आहे की, लहानपणी आमचे फार हाल झाले. खायला पुरेसे मिळत नव्हते. मालकाच्या डुकराच्या तोंडातील पडलेले मक्याचे दाणे आम्ही (मी व माझा भाऊ) वेचून खात होतो. अंगात तागाचे खरखरीत सदरे घालीत होतो आणि डोक्याला घालायला टोपी मिळत नव्हती. वयाच्या सातव्या वर्षी आईने एका फाटक्या कपड्याला दोन दोरे घालून मला पहिली टोपी दिली!

प्राचीन काळी कदाचित आपल्या देशात गुलामगिरी असावी. पण अलीकडच्या पुष्कळ वर्षांत ती युरोपीय देशांत होती तशी असल्याचे आढळत नाही. मुसलमानी अमलात व इंग्रजांच्या कारकीर्दीतही वेठ-बिगारीची पद्धत होती, ती याच प्रकाराचा एक नमुना म्हणता येईल. सरकारी अधिकारी एका गावाहून दुसऱ्या गावाला मुक्काम

हलविताना गावातील काही लोकांना व त्यांच्या गाडयांनाही वेठीला धरीत. म्हणजे त्यांच्यावर सक्ती करून त्यांना कामाला लावीत. गाडीतून व माणसांनी ओझी वाहणे हे ते काम. त्या कामासाठी केव्हा काही देत, बहुधा काही देत नसतच. वेठीची ही पद्धत म्हणजे गरीब लोकांवरील जुलूमच होता.

युरोपीय पद्धतीची गुलामगिरी आपणाकडे नसली, तरी आपल्याकडे वेगळ्या एका जातीची गुलमगिरी पुष्कळ वर्षांपासून चालू आहे, अजूनही ती नाहीशी झालेली नाही. युरोपीय पद्धतीची गुलामगिरी एक प्रकारच्या आर्थिक स्वरूपाची होती. आपल्या देशातील गुलामगिरी ही धार्मिक किंवा सामाजिक स्वरूपाची आहे.

आपल्या देशातील गुलामगिरी ही चातुर्वर्ण्य पद्धतीतून उत्पन्न झालेली आहे. चातुर्वर्ण्य पद्धती म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे माणसांचे चार भाग पाडणारी पद्धती. असे म्हणतात की सुरवातीला माणसांच्या गुणकर्मावरून हे चार भाग मानण्यात आले. एकाच समाजातील इतकेच नव्हे तर एकाच कुटुंबातील माणसातही हे चार भाग असू शकत होते. देवाधर्माकडे ज्याचा ओढा असेल आणि त्या दृष्टीने जो विचार व आचार करीत असेल अशा माणसाला त्याकाळी ब्राह्मण समजत. जो माणूस शूर आहे, वीर आहे, आणि जो आपले व आपल्या

कुटुंबाचे किंवा समाजाचे रक्षण करण्याला समर्थ आहे,त्याला क्षत्रिय समजत. ब्रह्म म्हणजे जगाची उत्पत्ती करणारा आणि सर्वांच्या ठायी असणारा जो परमेश्वर त्याला जाणण्याचा प्रयत्न करणारा तो जसा ब्राह्मण, तसा क्षता-पासून म्हणजे पीडेपासून किंवा संकटापासून तारण करणारा ( त्रायते ) तो क्षत्रिय समजला जात असे. वैश्य म्हणजे शेतीवाडी करणारा आणि व्यापारउदीम पाहणारा. सर्व-सामान्य सारी माणसे वैश्यच असत. विश् शब्दाचा मूळचा अर्थ सर्वसाधारण माणूस असाच आहे. शूद्र म्हणजे ज्याला ब्राह्मणाचे, क्षत्रियाचे किंवा वैश्याचे काम जमत नाही असा माणूस. कसलेही कसब नसलेला केवळ सांगकाम्या म्हणून केवळ दुसऱ्याची सेवा करणारा माणूस.

अशाप्रकारचे चार वर्ण जगातील कोणत्याही देशात आणि कोणत्याही समाजात असतात. ज्ञान मिळविणारे किंवा दुसऱ्याला ज्ञान देणारे, लष्करात किंवा पोलिसात काम करणारे, शेती किंवा व्यापार धंदा करणारे आणि नोकरी करणारे लोक कुठे नाहीत ? इतकेच नव्हे तर आजच्या भारतातील ब्राह्मणांच्या अथवा क्षत्रियांच्या कुटुंबांतही अशा प्रकारची कामे करणारी माणसे आढळतील.

गुणावरून किंवा कामावरून असे पडणारे भेद स्वाभाविक आहेत. आपल्या देशातही पूर्वी केव्हातरी असे भेद पडलेच. पण ह्याच भेदाला पुढे केव्हातरी जातींचे स्वरूप

आले; आणि गुणकर्मांचे तत्त्व मागे पडून जन्माचे स्वरूप प्राप्त झाले. ब्राह्मणाच्या पोटी जन्माला आला तो ब्राह्मण आणि शूद्राच्या पोटी जन्माला आला तो शूद्र! मग त्याचे गुण किंवा कर्म कोणते का असेना, असे स्वरूप ह्या चातुर्वर्ण्याला प्राप्त झाले आणि असे झाले त्याच वेळेला श्रेष्ठकनिष्ठतेचे किंवा उच्चनीचतेचेही रूप त्याला प्राप्त झाले.

## ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्

ब्राह्मण हे त्याचे म्हणजे परमेश्वराचे तोंड आहेत आणि शूद्र त्याचे पाय आहेत, असे समजण्यात येऊ लागले. ह्याचाच अर्थ ब्राह्मण हे श्रेष्ठ आहेत आणि शूद्र हे क्षुद्र किंवा कनिष्ठ आहेत, असे मानण्यात येऊ लागले. समाजामध्ये हे भेद जेव्हापासून पडले, तेव्हापासून समाजाची छकले पडली आणि भारताच्या अधःपातालाही सुरवात झाली. समाजातील एकजूट भंग पावली आणि परक्या शत्रूंनी स्वाऱ्या केल्या, तेव्हा साहजिकच एथील लोकांचा पराजय झाला.

ह्याहूनही वाईट गोष्ट घडली ती ही की, भारतामध्ये राहणारे जे मूळचे लोक होते आणि बाहेरून आलेल्या प्राचीन काळच्या द्रविड, आर्य वगैरे लोकांनी जेव्हा त्यांना जिंकून घेतले, तेव्हा त्यांना त्यांनी आपल्यात मिसळून घेतलेच नाही, त्यांना बाहेर ठेवले. चारी वर्णांच्या बाहेर त्यांचा एक वेगळाच वर्ण पंचम वर्ण मानण्यात येऊ लागला

व त्यांना अतिशूद्र किंवा अस्पृश्य ठरविण्यात आले. ह्या लोकांना गावाच्या बाहेर राहायला जागा दिली व त्यांची शिवाशीवसुद्धा होऊ नये अशी खबरदारी घेतली. त्यांना शिवूनच घ्यायचे नाही, तेव्हा त्यांच्याशी खाणे-पिणे किंवा शरीरसंबंध करणे कुठले होणार ? पश्चिमेकडील लोक गुलामांना असे इतके तुच्छ लेखीत नव्हते. त्या गुलामांच्या पलीकडचे जिणे ह्या अस्पृश्य लोकांच्या वाट्याला भारता-मध्ये आले. जनावरांच्या पलीकडे त्यांना वागणूक दिली. सामान्य भारतीय आपल्या गाईबैलांना शिवत होते. त्यांना आंजारीत होते, गोंजारीत होते; इतकेच नव्हे तर ते गाईचे मूत व शेणही पवित्र मानीत होते, पण अस्पृश्याला इतका-ही मान ते देत नव्हते. माणसाला माणुसकी नाही पण पशु-त्वही द्यायला तयार नसलेल्या समाजाला काय म्हणायचे ? बरे, हा अस्पृश्य समाज तरी थोडा थोडका आहे काय ? एकंदर समाजाचा सहावा हिस्सा एवढे हे लोक आहेत.

शहाण्या लोकांचे म्हणणे आहे की ऋग्वेदकालीन समा-जात भेदाभेद किंवा उच्चनीचपणाच्या कल्पना नव्हत्या ; निदान प्रखर तरी नव्हत्या. आज ज्यांना आपण कमी दर्जाचे मानू अशा बऱ्याच लोकांनी ऋग्वेदातील सूक्ते किंवा ऋचा तयार केलेल्या आहेत. तेव्हा त्यानंतरच्या काळात केव्हातरी जातिभेद पडलेले आहेत.

जातिभेद पडून ते जेव्हा कठीण झाले, स्थिर झाले

आणि समाजातील समानता नाहीशी झाली, तेव्हा समाजाचा डाव अडला. समाजाचा जीवनप्रवाह गढूळ झाला, एकप्रकारे कुजला, म्हणून त्यातून मार्ग काढण्यासाठी काही महात्म्यांनी म्हणजे थोर लोकांनी प्रयत्न केले. अशा प्रयत्नातील पहिला आणि मोठा प्रयत्न गौतमबुद्धाने केला. भगवान बुद्धदेवाने आपला धर्म–बौद्धधर्म प्रचलित केला, त्यातील लोकांना त्यांनी भेदाभेद नाहीसा करून एकत्र आणले. समान पायरीवर आणले. अस्पृश्यांनाही आपल्या बरोबर घेतले. सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी ही गोष्ट घडून आली. जैन धर्म संस्थापक भगवान महावीर यानीही याच प्रकारचे कार्य त्याच वेळी केले. गौतम बुद्धानंतर सम्राट अशोकाच्या कारकीर्दीत व त्यानंतर काही काळ बौद्धधर्माचा प्रसार भारतभर व बाहेर परदेशांतही झाला. पण ही स्थिती पुढे सातआठशे वर्षांनी बदलली व हिंदू धर्माला कुमारिल भट्ट व पहिले शंकराचार्य यांच्या प्रयत्नाने पुन्हा जोर चढला व चातुर्वर्ण्य पुन्हा पहिल्यासारखे चालू झाले. समाजातील समतोल पुन्हा ढळला.

समाजातील ही विषमता नाहीशी करण्याचा प्रयत्न पुढे लिंगायत धर्माची स्थापना करून बसवेश्वर ह्या थोर पुरुषाने केला; आणि ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादी साधू पुरुषांनी जातिभेदाविरुद्ध जनतेला शिकवण देण्याचा प्रयत्न केला.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म
भेदाभेद भ्रम अमंगळ

हा संत तुकारामाचा अभंग प्रसिद्धच आहे. एकनाथ-महाराजांनी त्याही पूर्वी अस्पृश्याचे चुकलेले मूल कडेवर घेऊन व श्राद्धाचे जेवण ब्राह्मणांआधी महारांना देऊन प्रत्यक्ष समतेचे आचरण करण्याचा प्रयत्न केला; पण, विषमतेच्या वृक्षाच्या मुळ्या इतक्या खोल गेल्या आहेत की, ती नाहीशी होण्याचे चिन्ह अजूनही स्पष्ट दिसत नाही.

अलीकडच्या शंभर वर्षांतही समाजाला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्याचा प्रयत्न काही महाभागांनी नेटाने केला. महात्मा जोतीराव फुले, कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले आहे. सरकारनेही ह्या दृष्टीने चांगली पावले उचलली आहेत. १९५० साली तयार झालेल्या घटनेने देशातील सर्व लोकांना समानतेचे हक्क दिलेले आहेत आणि अस्पृश्यता पाळणाऱ्याला शिक्षा देणारे कायदेही सरकारने केलेले आहेत. त्यामुळे आता परिस्थितीत थोडा थोडा बदल होत आहे. सरकारने दिलेल्या सवलतीने अस्पृश्यांतील पुष्कळ लोक शिकून शहाणे झालेले आहेत, त्यांतील बरेच जण मोठमोठ्या सरकारी नोकरीत अधिकारपदावरही आहेत; आणि दळणवळणाची साधने फार वाढल्यामुळे व शहरांची

वस्तीही भरमसाट वाढल्याने बऱ्याचशा प्रमाणात अस्पृश्यता नष्ट झालेली आहे.

अस्पृश्य समाजातच डॉ. भीमराव आंबेडकर यांच्यासारखा फार मोठा पुरुष अलीकडच्या काळात होऊन गेल्याने व खालच्या वर्गातील लोकांत त्याने स्वाभिमानाची ज्योत पेटविल्यामुळे पुष्कळ कार्य झालेले आहे. डॉ. आंबेडकर मोठे विद्वान पुरुष होते व मोठे कायदेपंडितही होते. भारताची चालू राज्यघटना त्यांनीच तयार केलेली आहे. त्यांनी वरच्या वर्गातील लोकांच्या विरुद्ध अनेकदा सत्याग्रहही केले आणि अडलेला डाव नीट सुटत नाही असे पाहून शेवटी इ. स. १९५६ त अस्पृश्य लोकांच्या हितासाठी म्हणून त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांच्याबरोबर त्यांच्या लाखो अनुयायांनीही बौद्ध धर्माचा अंगीकार केलेला आहे.

असे घडूनही हा कुजलेला डाव अजून चांगल्या रीतीने सुटलेला नाही. तथापि सरकार व मोठमोठे पुढारी आता हा प्रश्न सोडविण्यासाठी मनापासून प्रयत्न करीत असल्याने हा डाव आता लवकरच व्यवस्थित रीतीने सुटेल अशी खात्री वाटते.

—६—

माणसाच्या धार्मिक जीवनामध्ये डाव अडण्याचे प्रसंग अनेक वेळा घडून आलेले आहेत. ‘ जेव्हा जेव्हा धर्माला

ग्लानी येते तेव्हा तेव्हा मी अवतार घेतो ' असे भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे, ते ह्याच संदर्भात.

धर्म ही माणसांनीच निर्माण केलेली बाब आहे. जीवन प्रवाहात अडथळा निर्माण झाला तेव्हा त्यांनी धर्म उत्पन्न केला आहे. अगदी प्राचीन काळी माणसाला धर्म माहीत नव्हता. पण सृष्टीमध्ये जेव्हा अनेक चमत्कार घडत असलेले त्या काळच्या माणसांना दिसले, तेव्हा त्यांच्या डोक्यात धर्माच्या कल्पनेचे बीज रुजले. आकाशातून पाऊस कोसळताना, विजा कडाडताना, अरण्यात वणवे लागताना, जमिनीला हादरे बसताना, मोठमोठी वादळे निर्माण होताना, महापूर येताना, वनस्पती उगवताना, त्याना फुले फळे येताना, किडामुंगी व पशुपक्षी जन्माला येताना, भोवताली वावरताना व त्यांचा अंत होताना, इतकेच नव्हे तर माणसांचेही जन्ममृत्यु होताना, जेव्हा जुन्याकाळच्या माणसांनी पाहिले आणि त्यांचे कारण जेव्हा त्यांना कळेनासे झाले, तेव्हा त्यांच्या डोक्यात धर्माच्या कल्पनेचा उदय झाला.

आकाशातील सूर्यचंद्रांचे उगवणे आणि मावळणे आणि रात्री आकाशाच्या मंडपाला लगटलेली ताऱ्यांची दुनिया हीसुद्धा माणसांची मती गुंग करून टाकीत होती. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे सुद्धा क्रमाक्रमाने पण वरचेवर येत असलेले बघून त्यांना आश्चर्य वाटत होते.

सृष्टीत आणि वर आकाशात घडणारे हे चमत्कार कोणीतरी घडवीत असले पाहिजे, असे जुन्या काळच्या माणसांना वाटले असले तर त्यात नवल काय ? हे चमत्कार घडवून आणणारे कोणीतरी दिसत नसले, तरी फार मोठे असले पाहिजे, त्याची शक्ती मोठी जबरदस्त असली पाहिजे, असेही त्यांना वाटणे ओघानेच आले; आणि ह्याच्या पुढची पायरी म्हणजे हे निरनिराळे चमत्कार घडविणारे जे कोणी असेल, त्याची मर्जी संपादन करावी, त्याचा कोप आपल्यावर होऊ नये, म्हणून त्याची स्तुती करावी, असा प्रयत्न त्या काळच्या माणसांनी केला; आणि एथेच धर्माचा आरंभ झाला.

त्या काळच्या लोकांना सृष्टीतील चमत्कार घडवून आणणाऱ्या शक्ती ह्या देवतारूप वाटल्या. त्या अनेक असाव्यात असेही वाटले. पाऊस पाडणारी, नद्यांना पूर आणणारी आणि पृथ्वीवर सगळीकडे पाणी पुरविणारी एखादी देवता असावी असे त्यांना वाटले. अग्नी उत्पन्न करणारी, वादळे निर्माण करणारी, जन्ममृत्यु घडवून आणणारी, निरनिराळे प्राणी उत्पन्न करणारी, अशा अनेक देवता असाव्यात, असे आरंभीच्या काळच्या लोकाना वाटले व ह्या देवतांच्या पूजेची—भक्तीची कल्पना त्यांच्या मनात निर्माण झाली.

माणसाप्रमाणेच किंवा इतर प्राणीमात्राप्रमाणेच ही

आपली पृथ्वी आणि आकाशातील सूर्यचंद्र व तारे ह्यांनाही कोणीतरी उत्पन्न केले असले पाहिजे व त्यांना नियमितपणे उगवायला, मावळायला व फिरायला लावले असले पाहिजे. हीही अशीच फार मोठी शक्ती असली पाहिजे, ही पुढची कल्पनाही काही काळानंतर जुन्या काळच्या माणसांच्या मनात उत्पन्न झाली आणि तीच धर्माच्या निर्मितीला कारण झाली.

आपण, आपल्या भोवतालचे जग आणि ह्या सर्वांचा चालक ह्यांच्यासंबंधी जुन्या काळच्या माणसांनी जो विचार केला, त्यालाच पुढे धर्म हे नाव पडले.

धर्माचा विचार करताना आरंभीच्या माणसांनी ज्या अनेक देवता मानल्या, त्या पुढे काही लोकांना अडचणीच्या वाटू लागल्या. ऋग्वेद कालापर्यंत अनेक देवताच होत्या. ऋग्वेदात अग्नि, वायू, मित्रावरुण,अश्विनौ, इंद्र, विश्वदेव, मरुत्, त्वष्टा, ब्रह्मणस्पति, सोम, ऋभु, सविता, प्रजापति, उषा, अर्यमा, आदित्य, पूषन्, सूर्य, द्यावापृथ्वी, यम, यमी इत्यादि पुष्कळ देवतांची स्तुती केल्याचे आढळून येते.

पुष्कळ काळपर्यंत अनेक देवतांचे राज्य पृथ्वीवर चालू होते. पण पुढे काही विचारवंतांना ह्या अनेक देवतांचा उबग आला. त्यांच्या विचारप्रवाहात अडथळा निर्माण झाला. एकप्रकारे त्यांचा विचारांचा डाव कुजला. मग यातून मार्ग काढण्यासाठी त्यांच्यातील शहाण्या लोकांनी

एक उपाय शोधून काढला. त्यांना एक वेगळी कल्पना सुचली. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश वगैरे पंच महाभूते व त्यांना चालना देणाऱ्या निरनिराळ्या देवता ह्या त्यांना ठेंगण्या वाटायला लागल्या. त्यांचे सामर्थ्य मर्यादित आहे, असे त्यांना वाटायला लागले. आणि ह्या सर्व देवतांना सामर्थ्य पुरवणारी अशी कोणी तरी एकादी जबरदस्त शक्ती असावी, अशी कल्पना त्यांच्या मनात उद्‌भवली.

एका ईश्वराची किंवा परमेश्वराची कल्पना अशा प्रकारे निर्माण झाली.

ह्या परमेश्वराला कोणी कधी पाहिले आहे काय ?

मुळीच नाही. पूर्वीही तो कधी कुणाला दिसला नाही आणि अलिकडच्या काळातही त्याला कोणी पाहिलेले नाही.

मग परमेश्वराची कल्पना ही कल्पनाच आहे काय ?

होय. ती एक कल्पनाच आहे.

आणि ऋग्वेदाच्या काळात किंवा त्याच्या अगोदरच्या काळात ज्या अनेक देवता मानलेल्या होत्या. त्यासुद्धा अशा काल्पनिकच होत्या. पोहून पोहून दमलेला माणूस पाय टेकायला जागा मिळताच विसावा घेत उभा राहतो, त्याप्रमाणे आपण आणि जग यांच्या उत्पत्ती, स्थिती, लय यांचा म्हणजे ही कशी उत्पन्न झाली आहेत, त्यांना कोण वाढवितो किंवा लहानाचे मोठे करतो आणि शेवटी त्यांना

कोण नाहीसे करतो, याचा विचार करून करून थकलेल्या माणसाच्या बुद्धीने परमेश्वर निर्माण करून थोडा विसावा घेतला आहे, इतकेच.

एकेश्वराची कल्पना जगातील शहाण्या लोकांना पुढे एवढी आवडली की, तिचा स्वीकार करून अनेक धर्म उदयाला आले. महात्मा येशू ख्रिस्ताने आणि पुढे पैगंबर महमद साहेबांनी ह्याच कल्पनेच्या आश्रयाने आपले ख्रिस्ती व इस्लाम धर्म स्थापन केले. हिंदू किंवा वेदान्त धर्माच्या अभिमान्यांपैकी पुष्कळांनी अगोदरच ह्या कल्पनेचा आश्रय केलेला होता.

वेदांच्या नंतर तयार झालेल्या उपनिषदांच्या काळात ह्या एकेश्वर कल्पनेला थोडे वेगळे स्वरूप प्राप्त झालेले होते. त्यांनी ह्या कल्पनेला ब्रह्म असे नाव दिले. जगातील साऱ्या घडामोडीच्या मुळाशी हे ब्रह्मच आहे, असे ह्या काळच्या ऋषींचे म्हणजे विद्वान लोकांचे म्हणणे होते.

ह्याच सुमारास 'लोकायत' किंवा चार्वाक पंथाचे काही विद्वान आपल्या देशात होऊन गेले. त्यांनी परमेश्वराची अथवा ब्रह्माची कल्पनाही धुडकावून लावली. त्यांचे म्हणणे होते की, ह्या जगाचा कर्ता वगैरे कोणी नाही. ते आपोआप केव्हातरी निर्माण झालेंले आहे आणि ते आपल्या नियमानुसार आपोआपच चालत राहिलेले आहे.

यानंतर थोड्याच काळात होऊन गेलेल्या भगवान

गौतमबुद्ध व भगवान महावीर यांनीही ईश्वरी कल्पनेचा आश्रय केला नाही. त्यांनी आपल्या बौद्ध व जैन तत्त्वज्ञानात जग हे स्वाभाविकपणेच निर्माण झालेले आहे, ह्यावरच भर दिलेला आहे; आणि त्यासाठी माणसाने माणुसकीच्या धर्माने वागावे, सदाचाराने वागावे, दुसऱ्यांना त्रास देऊ नये, होईल तेथपर्यंत दुसऱ्यांचे कल्याणच करावे इत्यादि आचरणीय धर्म सांगितलेला आहे.

ह्या क्रांतीकारक विचारांमुळे पूर्वीच्या अडलेल्या धार्मिक विचाराला वेगळी कलाटणी मिळाली. पंचमहाभूतादिकांच्या मुळाशी असलेल्या व इतर काल्पनिक देव देवतांच्या पूजाअर्चेचा आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या यज्ञयागाचा मार्ग सामान्य लोकांनी बऱ्याच अंशाने सोडून दिला.

भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान त्याच क्रांतीकारक काळातील आहे. अर्जुनाचा अडलेला डाव मोकळा करण्यासाठी भगवान श्रीकृष्णाने हे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. कौरव आणि पांडव लढाईला उभे राहिलेले असताना पांडवांचा प्रमुख वीर अर्जुन याच्या मनात गोंधळ उडाला, त्याच्या मनाला मोह पडला, आपण लढणार आहोत ह्या लढाईने आपले सगळे आप्तइष्ट आणि जवळची प्रेमाची माणसे मरणार आहेत, तेव्हा असली लढाई करण्यात काय अर्थ आहे, असे त्याला वाटायला लागले आणि हातातील धनुष्य बाण बाजूला टाकून तो रथात सचिंत बसला.

त्यावेळी त्याचे गाडे अडले. श्रीकृष्णानी त्याला उपदेश करून त्याचे अडलेले गाडे मार्गी लावले.

जन्मलेल्या माणसाला मरण येणारच आणि मेलेल्याला पुन्हा जन्म प्राप्त होणरच. हा निसर्गाचा नियम आहे. ह्यातील तुझ्या हातात काही नाही. तू आता लढाई केली नाहीस तरी तुझ्यापुढे लढाईसाठी उभी असलेली माणसे कायमची मुळीच जगणार नाहीत, निरनिराळ्या कारणांनी ती केव्हाना केव्हा मरतीलच. आज फक्त तू निमित्त होणार आहेस. जन्ममृत्यूची काळजी करू नकोस. जुने झालेले वस्त्र फेकून देऊन दुसरे वस्त्र माणूस धारण करतो, त्याप्रमाणे एक शरीर सोडून देऊन माणूस दुसरे शरीर धारण करतो. म्हणजेच मरण. हे आपोआप होतेच, त्याची चिंता करण्याचे कारण नाही.

असे सांगून आणि हे सारे मीच घडवून आणीत आहे, माझ्यावर विश्वास ठेवून तू लढाईला तयार हो, असे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले व आपले विश्वरूप दाखवून त्याची खात्री पटवून दिली.

ह्या गीतेत माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या चैतन्याला आत्मा म्हटलेले आहे. प्रत्येक प्राणीमात्राच्या ठिकाणी असा आत्मा आहे आणि साऱ्या जगात तो भरलेला आहे, त्यालाच परमात्मा म्हणतात, तोच ईश्वर, तोच परमेश्वर आणि आपण सर्वजण त्याचेच अंश आहो, आपणही

परमेश्वरच आहो, अशाप्रकारचे हे तत्त्वज्ञान आहे.

हे असले तत्त्वज्ञान उपनिषदांनी सांगितले आहे.

अहंब्रह्मास्मि

म्हणजे मी ब्रह्म आहे आणि

तत्त्वमसि

म्हणजे तू तेच आहेस, असे सांगून

ईशावास्यमिदं सर्वम्

म्हणजे सारे जगच ह्या परमात्म्याने व्यापलेले आहे, असे उपनिषदांनी म्हटलेले आहे.

भगवद्गीता ही साऱ्या उपनिषदांचे सार आहे, असे म्हणतात, तेव्हा गीतेत ह्याच प्रकारचे तत्त्वज्ञान असणे स्वाभाविक आहे. ह्या धार्मिक विचारात अनेक देव देवता आणि त्यांची उपासना किंवा पूजाअर्चा कोठेही सांगितलेली नाही. श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की, तू फक्त माझ्यावर विश्वास ठेव, मी सांगतो ते ऐक, बाकी काही करू नकोस, म्हणजे तुझे कल्याण होईल.

एकेश्वरी मार्गाचाच हा एक प्रकार.

अलिकडच्या काळात म्हणजे सुमारे साठसत्तर वर्षापूर्वी उपनिषदांचे हेच तत्त्वज्ञान स्वामी विवेकानंद व स्वामी रामतीर्थ यांनी अधिकच स्पष्ट करून सांगितले आहे. ईश्वर सर्वत्र भरलेला आहे. तेव्हा त्याची सेवा करावयाची म्हणजे आपल्या भोवतालच्या दीनदुबळ्यांची, गरिबांची सेवा

केली म्हणजे झाले. लोकसेवा हीच ईश्वरसेवा होय. स्वामी विवेकानंद ज्ञानयोग सांगताना म्हणतात, "परमेश्वर म्हणजे काय हे मला माहीत आहे. तुला त्याचे वर्णन सांगणे शक्य नाही. परमेश्वर कसा आहे हे मला माहीत नाही. मग मी त्याचे वर्णन कसे करू ? पण तो तूच आहेस हे तुझ्या लक्ष्यात येत नाही काय ? तो तूच आहेस; मग परमेश्वराला धुंडीत इकडे तिकडे का भटकावे ? भलतीकडेच शोध करीत फिरू नको. तू केवळ आपले स्वतःचे रूप पहा. तोच परमेश्वर आहे." रामतीर्थांनी तर आपल्या एका व्याख्यानात सांगितले आहे की, "आपल्या घरातील आपली मुले व बायको यांच्या डोळ्यांत पहा, तेथे तुम्हांला ईश्वराचे दर्शन होईल. चैतन्य तेथे भरून राहिलेले आहे. ह्या बायकामुलांचे आणि आईबाप व कुटुंबातील इतर माणसे यांच्या हिताचे काम करणे ही ईश्वरसेवाच आहे. मात्र ती समजून उमजून, जाणून घेऊन निरिच्छ बुद्धीने करणे जरूर आहे."

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

असे तुकाराम महाराजांनी म्हटलेले आहे, तेही ह्या तत्त्वज्ञानाच्याच अभ्यासाने.

"देवळात किंवा देव्हाऱ्यात तू कोणाच्या दर्शनासाठी थांबला आहेस, तुला हवा असलेला देव तेथे नाही. तो



रस्त्यावर उन्हातान्हात घाम गाळून खडी फोडत असलेल्या मजुरांच्या जवळ उभा आहे" अशा अर्थाचे कविवर्य रवींद्रनाथ टागोरांचे गीतही हेच तत्त्वज्ञान सांगते,

—७—

माणूस हा विचारी प्राणी आहे. आपले विचार अमलात आणण्याचे सामर्थ्यही त्याच्या ठिकाणी आहे. त्यामुळे त्याने आपल्या जीवनात अनेक नवे नवे शोध लावलेले आहेत. माणसाच्या भोवताली अफाट पसरलेला निसर्ग आहे. त्या निसर्गाचा उपयोग करून घेऊन तो जगत असतो. जमीन, हवा, पाणी निसर्गाने निर्माण केलेली आहेत; आणि वनस्पती, पशू–पक्षीही त्यानेच निर्माण केलेली आहेत. त्यांपैकी आपले पोट भरायला जे उपयोगी पडेल ते माणूस आरंभापासून घेत आला आहे. इतर प्राणीही निसर्गाने दिलेल्या त्या वस्तूंचा उपयोग करून घेऊनच जगत आहेत. पण माणूस हा इतर प्राण्यांप्रमाणे केवळ निसर्गाच्या लहरीवर अवलंबून राहिलेला नाही. त्याने विचार करून व नव्या कल्पना लढवून निसर्गाचा वेगळ्या प्रकारे उपयोग करून घेतला आहे.

इतर प्राणी हे फार प्राचीन काळी जसे जन्माला आले, तसेच जवळ जवळ आजही राहात आहेत. त्यांचे खाणे पिणे, घर बांधणे आणि इतर राहाणे यांच्यामध्ये बदल झालेला दिसत नाही. माणसाने त्या मानाने आपल्या राहणीत पुष्कळच बदल केलेला आहे. आपणाला लागणारे अन्न आताचा माणूस जमिनीतूनच पण आपणाला हवेतसे आपल्या प्रयत्नाने तयार करून घेत आहे. पाणीही आयते

न घेता विहिरी खणून किंवा तलाव बांधून आपणास हव्या त्या रीतीने घेत आहे. त्याने आपल्या कपडचालत्त्यात आणि घरादारातही फारच सुधारणा केलेली आहे.

आपल्या जीवनात जेव्हा जेव्हा खटकायला लागले, अडायला लागले, डाव कुजल्यासारखा व्हायला लागला, तेव्हा आपले डोके चालवून माणसाने त्या डावावर मात केली व आपले जीवन सुरळीत मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला.

अनंत काळपर्यंत पूर्वीचा माणूस निसर्गावर अवलंबून होता. थंडी, ऊन, वारा यांचा त्रास सहन करीत होता. निसर्गानेच तयार केलेल्या–तयार झालेल्या–एकाद्या गुहेचा आश्रय करून, झाडाच्या सावलीत राहून किंवा झाडाची पाने आणि साली यांचा उपयोग करून, आरंभीचा माणूस राहात होता. निसर्गावर मात कशी करावी, आपणाला येणारी अडचण दूर कशी करावी हे पुष्कळ काळपर्यंत माणसाला कळलेच नाही, एकप्रकारे त्याचे गाडे अडलेच होते. पण एकाएकी माणसाला युक्ती सुचली आणि त्याने विस्तवाचा शोध लावला. सोसाटयाच्या वाऱ्याने किंवा वादळामध्ये झाडावर झाडे आदळून अरण्याला वणवे लागताना माणूस पुष्कळ वर्षे पाहात होता. एकदा त्याला वाटले आपण झाडाच्या फांदीवर फांदी घासून किंवा घुसळून पाहिली तर काय होईल ? पुष्कळ काळ अशा प्रकारचा प्रयत्न केल्यावर

5775





त्याला यश आले आणि माणसाने एकदाचा अग्नि तयार केला.

अग्नीचा किंवा विस्तवाचा शोध हा माणसाच्या जीवनातला फार मोठा क्रांतीकारक शोध होता. माणसाचे जीवनच त्यामुळे बदलून गेले. आणलेली शिकार आता त्याला भाजून खाता येऊ लागली, शेकोटी करून थंडीपासून बचाव करता येऊ लागला, रानटी प्राण्याला पेटलेली चूड

दाखवून पळवून लावता येऊ लागले आणि अंधाऱ्या रात्रीही उजेड पाडता यायला लागला. माणसाने ज्ञानाचा पाडलेला हा पहिला प्रकाश त्याच्या जीवनाला पुष्कळच कलाटणी देऊन राहिला आहे, हे आज आपणाला सर्वत्र दिसून येत आहे.

गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात. जुन्या काळच्या लोकांना जेव्हा जेव्हा गरज लागली, त्यांचे गाडे अडल्यासारखे झाले, तेव्हा तेव्हा त्यांनी नवे नवे शोध लावले व आपल्या जीवनक्रमात सुधारणा घडवून आणली. शेती करण्याचा शोध, मातीची भांडी करण्याची सुरवात, कपडे तयार करण्याची कला किंवा राहायला घरे बांधण्याची विद्या त्यांनी अशाच प्रकारे मिळविलेली आहे.

एक काळ असा येऊन गेला की, विद्या ही काही थोड्या लोकांच्याच हातात राहिलेली होती. ज्ञानाचा मक्ता त्यांनी आपणाकडेच राखून ठेवला होता. त्यामुळे सामान्य जनता अडाणी राहिली आणि शहाणे म्हणविणारेही नवीन काही ज्ञान मिळविण्यापेक्षा लहानशा डबक्यातच डुंबत राहिले. त्यानी ज्ञानाला बांध घातले. आपल्या भारत देशात दोन-तीन हजार वर्षांपूर्वीच्या शहाण्या लोकांनी ज्ञान हे संस्कृत भाषेत रचून ठेवले होते. सामान्य लोकांना ही संस्कृत भाषा कळत नव्हती. सामान्य लोकांची भाषा ही बोली भाषा होती. ह्या बोली भाषेत हे ज्ञान येऊ नये व सामान्य

माणसांना ते कळू नये, अशी खबरदारी त्या काळच्या स्वार्थी विद्वानांनी घेतलेली होती. त्यामुळे ज्ञान कुजून चालले होते. डाव अडलेला होता. महात्मा गौतम बुद्धाने ही कोंडी फोडली. त्याने सामान्य लोकांच्या भाषेत–पाली मध्ये–ज्ञानभांडार खुले करून टाकले.

त्यानंतर बऱ्याच वर्षांनी महाराष्ट्रात महानुभाव पंथाच्या लोकानी मराठी भाषेमध्ये ग्रंथरचना करण्याला आरंभ केला आणि त्याच सुमारास होऊन गेलेल्या ज्ञानेश्वर महाराजांनी संस्कृतात अडकून पडलेले ज्ञानभांडार मराठीत आणून सोडले.श्रीमद् भगवद्गीतेतील ज्ञान त्यांनी ओवीमध्ये रचून सर्व सामान्य जनतेला कळेल असे केले. सुमारे सातशे वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. ज्ञानेश्वरांची ही काव्यरचना 'ज्ञानेश्वरी' ह्या नावाने आजही लोक भक्तिभावाने व आदराने वाचीत आहेत.

पुढे एकनाथ महाराजांनी व तुकोबारायांनी हेच काम मोठ्या आवडीने केले. तुकाराम महाराजांचे अभंग हे महाराष्ट्र वेद म्हणून प्रसिद्ध आहेत.

आता ज्ञानाचे बांध फुटलेले आहेत. ते आता काही थोड्या लोकांच्या मालकीचे राहिले नाही. त्यामुळे मध्यंतरी बराच काळ ह्या बाबतीतील अडलेले गाडे सुरळीत चालू झालेले आहे.

आपल्याप्रमाणे ख्रिश्चन लोकांचे धर्मज्ञानही पुष्कळ

काळ काही थोडया लोकांच्या हातात कोंडून पडलेले होते. त्यांचा पवित्र ग्रंथ बायबल हा मूळ लॅटिन भाषेत होता. ह्या बायबलचे इंग्रजी भाषेत पहिल्यांदा भाषांतर जॉन वेक्लीफ ह्या धर्मोपदेशकाने इ. स. १३८२ च्या सुमारास केले. जॉन वेक्लीफ हा इंग्लंडमधील बॅलीऑल कॉलेजमध्ये प्रमुख होता. तो रोमन कॅथॉलिक पंथाचा धर्मोपदेशक होता. पण सर्व सामान्य इंग्लिश लोकांना लॅटिन भाषा समजत नसल्याने भगवान येशू ख्रिस्ताचे विचार त्यांना वाचता येत नव्हते. ख्रिस्ताचे बोल सर्वांना समजावेत म्हणून वेक्लीफने धाडस केले आणि बायबलाचे इंग्रजीत भाषांतर केले. पण त्या काळच्या सनातनी विचाराच्या लोकांना हे आवडले नाही.

वेक्लीफचा एक अनुयायी जॉन हस म्हणून होऊन गेला. त्याने वेक्लीफच्या ग्रंथांची भाषांतरे आपल्या देशाच्या भाषेत झेकोस्लोव्हाकियात केली. आपले स्वतःचे धार्मिक विचारही त्या देशाच्या बोलभाषेतच तो सांगत असे. हा जॉन हस मोठा विद्वान पुरुष होता. तो त्याच्या देशातील प्राग युनिव्हर्सिटीचा रेक्टर ( प्रमुख ) होता. पण त्याचे धाडस त्याच्याच देशातील जुन्या विचाराच्या लोकांना आवडले नाही. जॉन हस हा भलते सलते विचार सांगून लोकांना धर्म मार्गापासून बाजूला नेत आहे, अशी फिर्याद रोमन कॅथॉलिक कोर्टात ह्या सनातनी लोकांनी केली;

आणि त्या काळच्या न्यायाधीशानी त्याला मरणाची शिक्षा दिली. लोकांनी त्याला लोखंडी खांबाला बांधून जाळून टाकले !

गॅलीलिओ म्हणून एक मोठा शास्त्रज्ञ इटली देशात होऊन गेला. त्याचा जन्म इ. स. १५६४ मध्ये झाला



होता व तो १६३२ मध्ये मरण पावला. ह्या शास्त्रज्ञाने एक नवीन गोष्ट जगाला सांगितली. दररोज सूर्य उगवतो आणि मावळतो, पण सूर्य स्वतः हे काही करत नाही. पृथ्वी स्वतःभोवती फिरते आणि ती गोल आहे, त्यामुळे सूर्य उगवलेला आणि मावळलेला दिसतो. पृथ्वी गोल आहे आणि ती स्वतःभोवती फिरते, हे सांगणे किती जरी खरे होते, तरी ते त्या काळच्या धर्ममार्तंडांना–धर्माच्या अभिमानी पुढाऱ्यांना–आवडले नाही. इ.स. १६३२ साली गॅलीलिओने हे एका ग्रंथात प्रसिद्धही केले. तेव्हा त्या काळच्या सनातनी लोकांनी गॅलीलिओ हा धर्मग्रंथांच्या विरुद्ध विचार मांडीत आहे म्हणून फिर्याद केली; आणि त्याला काही दिवस तुरुंगात डांबून टाकले. हा गॅलीलिओ किती मोठा विद्वान होता, याची आजही थोड्याच लोकांना कल्पना असेल. तो ज्योतिर्विद होता. आकाशातील ज्योती म्हणजे तारे यांचे ज्ञान त्याने मिळविले होते. ह्याच साठी त्याने दुर्बिण तयार केली होती. दुर्बिणीतून आकाशातील ज्योती पाहणारा तो पहिलाच शास्त्रज्ञ होता. सूक्ष्मदर्शक यंत्रातही त्याने सुधारणा केली. थर्मामीटर तयार करण्याचाही प्रयत्न त्याने केला. शनि ग्रहाभोवती कडी आहेत हे त्यानेच जगाला प्रथम सांगितले. सूर्यावरील डागांची माहितीही त्यानेच प्रथम दिली. घड्याळाचा लंबक त्यानेच तयार केला आणि प्रकाशकिरणांचे

मोजमापही त्याने केले. अशा थोर पुरुषाला त्या काळात नवे विचार सांगितल्याबद्दल तुरुंगात पडावे लागले.

स्वतंत्र विचार करण्याचे माणसाचे सामर्थ्य कसे गंजले होते आणि त्या दृष्टीने डाव कसा अडलेला होता, हे यावरून दिसून येईल.

रोमन कॅथॉलिक धर्मगुरू पोप यांच्या आज्ञा जेव्हा जुलमाच्या आणि समाजहिताला बाधक आहेत असे वाटायला लागले, तेव्हा जर्मनीतील एक प्रोफेसर मार्टिन ल्यूथर ( इ. स. १५०० चा सुमार ) याने पोपच्या त्या आज्ञा जाळून टाकल्या व नवे धार्मिक विचार लोकांपुढे मांडून प्रॉटेस्टंट पंथाची स्थापना केली.

अशा प्रकारचे क्रांतिकारक व संशोधक निपजल्याने खिस्ती लोकांमध्येही विचारस्वातंत्र्याला वाव मिळाला; आणि अनेक संशोधक निर्माण होऊन त्यांनी जगाची भरभराट होण्यास हातभार लावला, हे आजकालच्या सुधारलेल्या जगावरून दिसून येत आहे.

— ८ —

आपल्या आजूबाजूची जी स्थीती असते, तिला परिस्थिती म्हणतात. आपले आईबाप, आपली बायकापोरे, आपले बहीणभाऊ, आपले इतर आप्तेष्ट, आपले घरदार, जमीन जुमला, आपला उद्योगधंदा, आपले गाव, आपला समाज, आपले राष्ट्र ह्या सर्वांना परिस्थिती म्हणतात.

त्या परिस्थितीत आपण लहानाचे मोठे होत असतो.

परिस्थिती नेहमीच अनुकूल असते असे नाही, पुष्कळदा ती प्रतिकूलच असते. आणि त्यामुळे आपले जीवन सुरळीत चालणे कठीण होते. त्यामध्ये अनेक वेळा अडचणी निर्माण होतात. अडचण निर्माण झाली की जीवन अडून राहाते. काही काळ तसाच जातो. मग आपल्या बुद्धिमत्तेने, आपल्या आप्तेष्टांच्या मदतीने, आपल्या समाजाची किंवा राष्ट्राची परिस्थिती बदलल्याने किंवा काही आकस्मिक कारण घडून, अडलेला डाव सुटतो. केव्हा केव्हा तो तसाच अडलेला आहे अशा स्थितीत आपणाला आपले जीवन संपवावे लागते.

माणूस जन्माला आल्यापासून म्हणजे फार फार पूर्वीच्या काळापासून हे असेच चालत आलेले आहे. माणसाला जगायसाठी अन्न आणि हवा-पाणी लागते. हवा निसर्गाने बहुतेकांना मुबलक दिलेली आहे. पाणीही कमी जास्त प्रमाणात पण पहिल्यापासून मिळत आलेले आहे. अन्नाची गोष्ट मात्र तशी नाही. त्यासाठी धडपड करावी लागते. त्यासाठी कष्ट करावे लागतात. राहात्या ठिकाणापासून दूर जावे लागते. भटकावे लागते.

प्राचीन काळच्या माणसांना असे भटकताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. जंगलातील किंवा रानातील हिंस्र प्राणी तर त्यांच्या वाटेत आड येतच,

पण निसर्गही वाट अडवीत असे. खाचखळगे, नदीनाले, डोंगर, जंगले यातून प्रवास करायचा म्हणजे जिवावरचाच प्रसंग असायचा.

त्यासाठी मग जुन्या काळच्या माणसाने अनेक युक्त्या योजल्या होत्या. हातात काठी घेऊन किंवा दगड धोंड्यांचा उपयोग करून तो आपले रक्षण करीत असे. पण लांब चालत जाण्यासाठी पुढे त्याने घोड्यासारख्या जनावराला माणसाळले; आणि भरलेल्या नदी नाल्यातून पार होण्यासाठी लाकडी ओंडक्यांचा उपयोग केला. नदीतून लाकडाचे ओंडके वाहात जाताना पाहिल्यावर माणसाला वाटायला लागले आपण त्यावर बसून गेले तर काय होईल? तसा प्रयत्न केल्यावर आढळून आले की नदीच्या प्रवाहातून धारेला लागून आपोआप प्रवाहाचा ओघ बदलून पलीकडेही जाता येते. मग साध्या लाकडी ओंडक्याच्याच पुढे नावा तयार केल्या. नदीच्या मोठ्या प्रवाहातून आजही कॅनडासारख्या देशातून लाकडांचे मोठमोठे ओंडके एकत्र बांधून दूरदूर वाहून नेण्यात येतात; आणि आपल्या इकडे लहान लहान नद्यांतून वैरणीचे भारे किंवा बिडे त्यांवर बसून पलिकडे नेले जातात! निसर्गाने निर्माण केलेला अडथळा दूर करण्याचा माणसाने केलेला हा एक मोठा प्रयत्न आहे. आज आता कितीतरी सुधारणा झालेली आहे. प्रवासाची कितीतरी साधने निर्माण

करण्यात आलेली आहेत आणि माणसे आता एका दिवसात अनेक वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालीत आहेत ! परिस्थितीवर मात करून आजची माणसे जगत आहेत ! !

ज्या पृथ्वीवर माणसे जन्माला आलेली आहेत, त्या पृथ्वीवरील हवा, पाणी आणि अन्न यांचा त्यांना अतिशय उपयोग होत आहे, त्यांच्यावर तर ही माणसे जगत आहेत. पण केव्हा केव्हा ह्याच हवा, पाणी आणि अन्न यांचयामध्ये काही बिघाड होऊन किंवा माणसाच्या वागणुकीत काही कमीजास्त होऊन माणसाला अनेक प्रकारचे विकार किंवा आजार होतात; आणि त्याच्या जीवनप्रवाहात अडथळे निर्माण होतात, केव्हा केव्हा हा जीवनप्रवाह कायमचाच खुंटून जातो !

रोगराई किंवा आजार निर्माण होऊन किंवा एखादा अपघात घडून येऊन माणसाचे जीवन जेव्हा अडल्यासारखे होते, सुरळीतपणा नाहीसा होतो, तेव्हा विचारी माणूस हताश होऊन जात नाही अथवा नुसता रडत बसत नही. अडलेले जीवन सुरळीत करण्यासाठी काही ना काही प्रयत्न करीत असतो. जुन्या काळापासून माणसे असे करीत आलेली आहेत. त्यांच्या ह्या प्रयत्नांतूनच आयुर्वेदाचा जन्म झालेला आहे. निरनिराळ्या रोगांवर किंवा अपघातातून निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करून माणसांनी अनेक उपाय किंवा उपचार

शोधून काढलेले आहेत. आयुर्वेदात हे सारे आहे. आयुर्वेद म्हणजे आयुष्याचे ज्ञान. लाभलेले आयुष्य सुखासमाधानाने घालविता यावे म्हणून मिळविलेले ज्ञान म्हणजेच आयुर्वेद. निसर्गानेच निर्माण केलेल्या वनस्पतींचा किंवा प्राण्यांचा उपयोग करून जुन्या पद्धतीने किंवा नवीन सुधारलेल्या पद्धतीने आजची माणसे रोगराईवर मात करीत आहेत. त्यामुळे माणसाचे जीवन अधिक सुखी झाले असून, त्यांचे आयुर्मानही वाढलेले आहे.

देवी, कॉलरा, प्लेग वगैरेसारख्या साथीच्या रोगांनी आणि काही काळ एन्फ्लुएंझासारख्या साथीच्या तापानेही माणसांच्या जीवनामध्ये मोठे अडथळे निर्माण केले होते. माणसांना ह्या रोगांनी अगदी बेजार करून सोडले होते. पण यांवरही माणसांनी औषधे शोधून काढली आणि आता त्यांना चांगलेच आटोक्यात आणलेले आहे.

मध्यंतरी क्षय रोगानेही असेच पीडलेले होते. अजूनही त्याचे प्रस्थ आहेच, पण आता त्यालाही आळा घालण्याचे सामर्थ्य माणसामध्ये आलेले आहे. मात्र सध्या हृदय विकार आणि कर्करोग म्हणजे कॅन्सर ह्या रोगांनी माणसांचे जीवन अडविलेले दिसते. त्यांच्या बाबतीत माणसांचे प्रयत्न अजून यशस्वी झालेले नाहीत, अडलेले आहेत. ह्या अडलेल्या डावांवरही विचारी माणसे मात

केल्याशिवाय राहणार नाहीत.

जन्मजातच किंवा पुढे केव्हातरी आंधळे, बहिरे किंवा पांगळे होऊन जीवनाचा गाडा रुतवून बसलेली माणसे आपण पाहातो. त्यांच्याबद्दल कीवही वाटते. पण हुशार माणसे असल्या परिस्थितीतूनही चांगला मार्ग शोधून काढून जीवन सुखात घालवितात. धन्य त्यांची !

--९--

आता ह्याच विषयातील आणखी एका महत्त्वाच्या अंगाचा विचार करावासा वाटतो. हे महत्त्वाचे अंग म्हणजे राजकारणाचे अंग. माणसांनीच माणसाचे डाव अडविलेले किंवा कुजविलेले असतात, तो हा भाग. हा भाग माणसाच्या जीवनात फार महत्त्वाचा असा आहे. कारण त्याचा परिणाम माणसाच्या दैनंदिन जीवनावरही घडतो.

पूर्वीच्या मानाने आता राजकारणाला फार महत्त्व प्राप्त झालेले आहे. पूर्वी आपल्या देशात लोकशाही नव्हती आणि आजच्या सारखा सलग किंवा एकसंध असा हा देश नव्हता. त्यावेळी देशात अनेक राज्ये होती आणि अनेक राजे होते. हे राजे आपल्या बळाने सत्तेवर आलेले असल्याने, ते कोणाला फारसे जुमानीत नसत. आपल्या इच्छेप्रमाणे कारभार करीत. प्रजेपैकी बहुतेकजण राजाच्या सत्तेकडे किंवा कारभाराकडे लक्ष देत नसत. कारण त्याकाळची गावे राजाला द्यायचा करभार दिला की, एक प्रकारे स्वतंत्रपणे

सुखासमाधानातच राहात. निरनिराळ्या राज्यांमध्ये लढाया झाल्या, तरच काही गावांना त्यांची झळ पोचत असे. त्यामुळे त्यावेळचे राजकारण सत्तालोलुप भाऊबंद ( राजाचे नातेवाईक ) किंवा सरदार सेनापती यांच्यामध्येच घुटमळत असे.

आज ती स्थिती राहिलेली नाही. आज आपला देश एक स्वतंत्र लोकशाहीप्रधान देश बनलेला आहे. आता आपल्या देशात कोणी राजा राहिलेला नाही, किंवा सरदार-दरकदार अथवा जहागीरदार-इनामदार राहिलेला नाही. आता लोकांनी निवडून दिलेले पुढारी राज्यकारभार करीत आहेत. ह्या निवडणुका दर पाच वर्षांनी होत असल्यामुळे आणि आपण कारभार नीट केला नाही तर लोक आपणाला पुन्हा निवडून देतीलच अशी खात्री नसल्यामुळे, राज्य कारभार करणारे पुढारी अगदीच बेदरकारपणाने वागत नाहीत. जरा मागेपुढे पाहून ते चालत असतात.

आपला देश १९४७ सालच्या १५ ऑगस्टला स्वतंत्र झाला आणि १९५० च्या २६ जानेवारीपासून नवीन घटनेप्रमाणे लोकशाही पद्धतीने आपल्या देशाचा राज्यकारभार चाललेला आहे. पण देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे डाव अनेकदा अडले होते; आणि नंतरही तसा प्रसंग आला होता.

इंग्रजांनी आपला देश जिंकल्यानंतर तो परत मिळविण्यासाठी १८५७ साली त्यांच्याविरुद्ध उठाव झाला होता आणि त्याला आपण स्वातंत्र्ययुद्ध म्हणतो, तरी तो उठाव मुख्यतः ज्यांची राज्ये गेली होती, त्या राजांनी व त्यांच्या सरदारांनी केलेला होता. सामान्य जनता त्यामध्ये सामील झालेली नव्हती.

सामान्य जनतेने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चळवळ केली, ती १८८५ साली नॅशनल काँग्रेस किंवा राष्ट्रीय सभा स्थापन करून. आरंभी बराच काळपर्यंत ह्या काँग्रेसचे धोरण इंग्रज सरकारकडून आपणाला काही हक्क मिळवावेत, एवढ्यापुरतेच मर्यादित होते. ह्या काळात इंग्रज सरकारची मर्जी सांभाळण्याकडेच पुढाऱ्यांची प्रवृत्ती होती. पण काँग्रेसच्या स्थापनेनंतर २१ वर्षांनी कलकत्त्याला भरलेल्या सभेत आपल्या देशातील पुढाऱ्यांनी जरा चढाईचे धोरण स्वीकारले. ही सभा एक ज्येष्ठ नेते दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली इ. स. १९०६ साली भरलेली होती. देशाला स्वातंत्र्य मिळविणे हे काँग्रेसचे ध्येय आहे, हे ह्या सभेत पहिल्या प्रथम जाहीर झाले. त्यासाठी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ही चळवळीची चार अंगे अंगिकारण्याचे ह्यावेळी पुढाऱ्यांनी ठरविले.

१९०५ साली गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यानी बंगाल देशाची फाळणी केली आणि तीही लोकमताला डावलून.

त्यामुळे सनदशीर चळवळीचे गाडे अडले. इंग्रज लोकांच्या राज्यकारभाराच्या धोरणावरील लोकांचा विश्वास उडायला सुरवात झाली. आणि म्हणूनच पुढील साली बंगालमध्येच कलकत्त्याला भरलेल्या काँग्रेसमध्ये इंग्रज सरकारच्या विरुद्ध चळवळीचा पाया घातला गेला. स्वदेशात तयार झालेलाच माल वापरावा, परदेशी मालावर बहिष्कार लावा, राष्ट्राबद्दल अभिमान निर्माण होईल असे शिक्षण देणाऱ्या शाळा काढाव्या आणि स्वातंत्र्य मिळविण्यावर लक्ष ठेवावे, असे कलकत्ता काँग्रेसने ठरविले

काँग्रेसच्या ह्या ठरावामुळे चळवळीच्या गाड्याला थोडा अडथळा निर्माण झाला. काँग्रेसमध्ये काम करणाऱ्या सरकारी नोकरांना आणि सरकारबद्दल आदर वाटत असलेल्या पुढाऱ्यांना काँग्रेसचे हे नवे धोरण आवडले नाही. त्यामुळे काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ असे दोन भेद पडले. १९०७ सालच्या सुरत एथे भरलेल्या काँग्रेसमध्ये सरळ मारामारी झाली.

ह्यापुढे काँग्रेसची सूत्रे हळूहळू जहाल पुढाऱ्यांच्या हाती आली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि मी तो मिळविणारच' हे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे वाक्य ह्यापुढे लोकांचेच ध्येयवाक्य बनले; आणि इंग्रज सरकारच्या विरुद्ध लोकमत जागृत करण्याला पुढाऱ्यांनी उघड उघड सुरवात केली. लोकमान्य टिळकांच्या

विरुद्ध सरकारने भरलेला खटला व त्यांना झालेली सहा वर्षांची शिक्षा हा ह्या चळवळीचाच परिणाम आहे. १९०८ ते १९१४ मध्ये टिळकांना ब्रह्मदेशात मंडाले येथे नेऊन ठेवले होते.

टिळकांचे जोडीदार लाला लजपतराय व बिपिनचंद्र पाल यांच्या विरुद्धही सरकारने हत्यार उगारले व बंगालमध्ये ह्या वेळी सुरू झालेली क्रांतिकारक चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पण सरकारला अखेर बंगालची फाळणी रद्द करावी लागली, मोर्ले-मिंटो सुधारणा नावाने लोकांना काही हक्क द्यावे लागले.

तरीपण मोठमोठ्या पुढाऱ्यांना सरकारने तुरुंगात डांबल्यामुळे चळवळीचे गाडे थोडे अडल्याखेरीज राहिले नाही. तशात १९१४ साली पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाले आणि ह्या युद्धात भारतीय सैन्याने इंग्रजांच्या बाजूने भाग घेतल्याने इंग्रज सरकार काहीतरी जनतेच्या हिताचे कार्य करील व लोकांना काही चांगले हक्क देईल, अशी आशा निर्माण झाली. शेवटी १९१७ साली युद्ध संपण्यापूर्वीच ( युद्ध १९१८ साली संपले ) भारतासाठी इंग्लंडमध्ये असलेले ब्रिटिश मंत्री लॉर्ड माँटेग्यू यांनी आणखी काही सुधारणा देण्याचे जाहीर केले; आणि १९१९ साली ह्या सुधारणा माँटफर्ड सुधारणा ह्या नावाने दिल्या गेल्या.


लोकांच्या अपेक्षेप्रमाणे नसल्या तरी ह्या सुधारणा

बऱ्यापैकी होत्या. काही लोकांना त्या पसंतही होत्या. अर्थात् चळवळ मंदावण्याला त्या कारणीभूत झाल्या असत्या. पण ह्याच १९१९ साली पंजाबात जालियनवाला येथे बागेत चळवळ्या लोकांवर इंग्रजी लष्कराने अमानुष हल्ला केला; आणि हजारो बायका-मुलांचीही कत्तल करून सन्मान्य लोकांनाही अपमानाची वागवणूक दिली, त्यामुळे पुन्हा चळवळीचा आगडोंब उसळला !

ह्यावेळी महात्मा गांधींची चळवळ उदयाला आली. म. गांधी १९१४ सालीच भारतात आले. त्यापूर्वी ते दक्षिण आफ्रिकेत होते. भारतातून तिकडे जाऊन राहिलेल्या हिंदी लोकांवर तेथील गोऱ्या लोकांनी लादलेले जुलमी कायदे रद्द करून घेण्याचा त्यांनी तेथे प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी चळवळीचे एक नवीनच शस्त्र निर्माण केले. त्यांची ही चळवळ म्हणजे असहकारितेची चळवळ. १९२० साली लोकमान्य टिळक निधन पावले व काँग्रेसची सूत्रे महात्मा गांधींच्या हाती आली. ब्रिटिश सरकारने चालविलेल्या जुलमाविरुद्ध गांधीजींनी ही आपली नवी चळवळ भारतातही चालू केली.

सरकारचे कायदे पाळायचे नाहीत आणि त्यासाठी शांततेच्या मार्गाने चळवळ करायची. हत्यारे वापरायची नाहीत. होईल ती शिक्षा मुकाटचाने सहन करायची. असली ही चळवळ होती. १९२० साली प्रथम, १९३०

साली दुसऱ्यांदा व १९४२ साली तिसऱ्यांदा गांधीजींनी ही चळवळ चालविली. ह्या २०।२२ वर्षांमध्ये अनेक घडामोडी झाल्या. १९२९ साली लाहोर येथील काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. पंडित जवाहरलाल नेहरू हे यावेळी अध्यक्ष होते. जवाहरलाल नेहरू यांच्याशिवाय सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, बाबू-राजेंद्र प्रसाद, सी. राजगोपालाचारिअर, पंडित गोविंद वल्लभ पंत, श्रीमती सरोजिनी नायडू इत्यादि कितीतरी थोर व्यक्ती ह्या काळात उदयास आल्या. बाबू सुभाषचंद्र बोस हे याच काळातील थोर पुरुष. ह्या सर्वांच्या चळवळीचा परिणाम म्हणून इंग्रजांचे गाडे अडले. त्यांनी आपले सर्व प्रयत्न करून पाहिले. लाखो लोकांना तुरुंगात डांबले, कितीकांना फाशीवर चढविले, अनेकांची कत्तल केली, पण शेवटी खवळलेल्या अफाट जनसागरापुढे त्यांना माघार घ्यावी लागली. ‘ आपण जोवर इंग्रजांना कारभार करू देत आहो तोवरच ते तो करतील, ज्याक्षणी आपण त्यांना कारभार करू देणार नाही, त्याक्षणी त्यांना तो सोडन द्यावा लागेल. ’ असे गांधीजी म्हणत आणि अखेरीस १९४२ सालच्या ९ ऑगस्ट रोजी तो क्षण उगवला. ‘ छोडो भारत ’ ‘ चले जाव ’ म्हणून मुंबईस भरलेल्या प्रचंड सभेत गांधीजींनी इंग्रजांना इशारा दिला, व त्याचा शेवट १९४७ सालच्या १५ ऑगस्टला होऊन भारताला संपूर्ण स्वतंत्र्य




मिळाले.

हे स्वातंत्र्य मिळतानाही गाडे अडलेच होते. इंग्रजांनीच हातभार लावून फोफावलेल्या मुसलमानांच्या मुस्लीम लीगने देशाच्या फाळणीची मागणी केली. आपल्या पुढाऱ्यांनी आरंभी ती मान्य केली नाही, पण अडलेला गाडा सुरळीत चालावा, म्हणून शेवटी त्या गोष्टीला त्यांनी मान्यता दिली. बंगालच्या १९०५ च्या फाळणीला विरोध करणाऱ्या पुढाऱ्यांच्याच वंशजांना १९४७ साली ती फाळणी मान्य करणे भाग पडले!

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू झाले. जवाहरलाल नेहरू हे अत्यंत लोकप्रिय पुढारी होते. त्यांच्या निधनापर्यंत म्हणजे १९६४ सालापर्यंत अनेक निवडणुका होऊन तेच पंतप्रधानपदी

राहिले. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कारकीर्दीतच देशाने 'समाजवादी समाजरचना' करण्याचे धोरण स्वीकारले. 'उत्पन्नाची प्रमुख साधने समाजाच्या मालकीची असावीत आणि जीवनावश्यक वस्तू सर्वांना मिळाव्यात, पण कोणा एकाजवळ त्या वाजवीपेक्षा जास्त असू नयेत' हे ते समाजवादी समाजरचनेचे ध्येय.

पंडित जवाहरलाल नेहरू आणि त्यांचे सरकार यांनी ह्या ध्येयाला धरून पावले टाकण्याचा प्रयत्न केला, पण त्याला जोराची गती मिळाली नाही. जुन्या परंपरेत वाढलेले व जमीनजुमला आणि संपत्ती बरेच असलेले त्यांचे जोडीदार किंवा त्या जोडीदारांचे नातलग यांच्याकडून ह्या ध्येयाला काहीसा अडथळाच होत राहिला. त्यामुळे ह्या ध्येयाप्रमाणे चालणारे गाडे अडल्यासारखे झाले. सामान्य लोकांमध्ये त्यामुळे काहीसा असंतोष निर्माण झाला.

हे लक्षात घेऊन १९६९ साली पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी अडलेल्या गाड्याला जोराने धक्का देण्याचा प्रयत्न केला. बंगलोर येथील काँग्रेसच्या सभेत त्यांनी ह्या दिशेने पावले टाकण्यास आरंभ केला. 'गरिबी हटाव'ची घोषणा त्यांनी केली; आणि आपल्या धोरणाला विरोधी वाटणाऱ्या मंत्र्यांना मंत्रीमंडळातून काढून टाकले. ह्यामुळे काँग्रेसची छकले उडाली. काँग्रेसमधील जुनी

मोठमोठी कर्ती माणसे फुटून निघाली. पण इंदिरा गांधींनी त्यांची पर्वा केली नाही. त्यानंतर त्यांनी लोकसभेची पुन्हा निवडणूक घेतली व आपल्या धोरणाला जनतेचा पाठिंबा मिळविला. आता सध्या पुन्हा देशातील दुष्काळी परिस्थिती व महागाई यांमुळे ह्या गाड्याला थोडा अडथळा निर्माण झालेला दिसतो, काय घडते ते पहायचे !

卐 卐 卐 卐

व्यक्तीच्या जीवनात व समाजाच्या किंवा राष्ट्राच्या जीवनात अडलेले डाव अनेक वेळा आलेले दिसून येतील. बेताची सामान्य माणसे ह्यावेळी खचून जाऊन नामशेष झालेली दिसतात, तर कर्तबगार माणसें परिस्थितीवर मात करून अडलेला गाडा पुन्हा सुरळीत चालू ठेवतात.

# इकडे तिकडे

## त्रिपुरा

त्रिपुरा हा आपल्या देशातील ईशान्य बाजूचा एक लहानसा देश आहे. ह्याची लोकवस्ती १९७१ च्या खानेसुमारीप्रमाणे १५, ५६, ८२२ आहे. बहुतेक लोक आदिवासी आहेत. प्रदेश बहुतेक डोंगराळ आहे. ६० टक्के भाग पर्वताने व्यापलेला आहे. उरलेल्या ४० टक्के भागात दोनतृतीयांश लोक राहातात. आदिवासी लोकांच्या १९ प्रकारच्या टोळ्या राहातात. त्यातील त्रिपुरी, रिआंग, नोआटिया, हालाम, जमाटिया, चाकमा, मॉग, लुशाई आणि कुकी ह्या ९ प्रमुख आहेत. ह्या राज्याची राजधानी आगरताला ही आहे. मुख्य जिल्हे तीन असून विधानसभेची सभासद संख्या ३२ आहे.

“ देश मोठा झाला तर
तुम्ही मोठे व्हाल !
देश मोठा होतो
तरुणांच्या कर्तृत्वावर !

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात अनेक प्राणांची आहुती पडली. स्वातंत्र्यासाठी अनेकांचे रक्त सांडले. ते अभिमानास्पद व चित्तथरारक कर्तृत्व कालालाही विसरता येणार नाही. आता स्वातंत्र्य-रक्षणासाठी सर्व क्षेत्रात उत्पादनवाढ करून प्रगतीची झेप घेण्यासाठी आणि सामाजिक न्यायासाठी तोच निर्धार, तोच निश्चय हवा. तरुण पिढीचे नवरचनेचे हात हवेत. ”

## महाराष्ट्रातील युवक
## उत्पादनाचे क्षेत्रात आघाडीवर राहतील!

महाराष्ट्र शासनाच्या
माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे.

# तारेच्या पत्त्यांत पांच शब्द विनामूल्य




तुम्ही पाठवत असलेल्या तारेंतील पत्ता लांबलचक
असला तरी काळजी करण्याचें कारण नाही.
अशा बाबतींत फक्त सुरवातीच्या पांच
शब्दाचा आकार घेतला जातो. बाकीचे
पांच शब्द मोफत स्वीकारले जातात
शब्दसंख्या दहापेक्षां जास्त असल्यास ज्यादा
शब्दांवर आकार घेण्यांत येतो:

गांवाच्या नांवानंतर **पीन-कोड**
लिहायला विसरूं नका. त्याबद्दल
पैसे पडणार नाहीत.

पूर्ण आणि बरोबर पत्ता लिहिल्याने
तार लवकर पोचण्याची शक्यता
असते, हें ध्यानांत असूं द्या.

davp 73/173

SAMAJ SHIKSHAN MALA
(Marathi Monthly)
Reg. No. P N C 34
फेब्रुवारी १९७४

# डेक्कन डाईज अॅन्ड केमिकल इंडस्ट्रीज

इंक-ब्ल्यू आणि पिगमेंट-ब्ल्यू चे निर्माते

# विवेक रिसर्च फौंडेशन

कन्सल्टिंग केमिस्ट आणि इंजिनिअर्स

# मे. शारदा इंटरप्राईजेस

फॅब्रिकेटर्स आणि विविध मशिनरीचे निर्माते

— कचेरी —

४४ शंकरशेट रोड, पुणे १ : फोन २७३८५